# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १६-१०-२०१७ रोजी संपन्न झालेल्या  सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक १६ ऑक्टोबर २०१७ रोजी (का.प.क्र.४८) मा.महापौर श्री.भगवान (बापू) देविदास घडमोडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी २.३० वा.सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.डी.एम मुगळीकर भाप्रसे, नगर सचिव,श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| २. | स.स. श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| ३. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ४. | स.स. श्री.खान फेरोज मोईनुद्दीन |
| ५. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ६. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ७. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ८. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ९. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| १०. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| ११. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| १२. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १५. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १६. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| १७. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| १८. | स.स. श्री.सय्यद मतीन रशीद |
| १९. | स.स. श्रीमती परवीन खैसर खान |
| २०. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २१. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २२. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २३. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २४. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २५. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २६. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २७. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २८. | स.स. श्रीमती सोनवणे भारती महेंद्र |

| | |
|---|---|
| २९. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३०. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३१. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३२. | स.स. श्रीमती वैशाली कारभारी जाधव |
| ३३. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३४. | स.स. श्रीमती खरात सुरेखा गौतम |
| ३५. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३६. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३७. | स.स. श्री.अजीम अहेमद रफीक |
| ३८. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ३९. | स.स. कु.यशश्री लक्ष्मीनारायन बाखरीया |
| ४०. | स.स. श्री.तनवाणी राजु लेखराज |
| ४१. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ४२. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४३. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४४. | स.स. श्रीमती चावरीया बबीता विजय |
| ४५. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४६. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४७. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ४८. | स.स. श्रीमती शेख समिना शेख इलियास |
| ४९. | स.स. श्रीमती  पठाण अस्मा फिरदोस रफीक पठाण |
| ५०. | स.स. श्री.जायभाय रमेश भानुदास |
| ५१. | स.स. श्री.शेख जफर अखतर |
| ५२. | स.स. श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ५३. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ५४. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ५५. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ५६. | स.स. श्रीमती जोहरा बी नासेर खान |
| ५७. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५८. | स.स. श्रीमती वाडकर शिल्पाराणी सागर |
| ५९. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ६०. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ६१. | स.स. श्रीमती विधाते अंकिता अनिल |
| ६२. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ६३. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ६४. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ६५. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ६६. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |

| | |
|---|---|
| ६७. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६८. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ६९. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ७०. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ७१. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ७२. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ७३. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७४. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७५. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७६. | स.स. श्रीमती विमल गोविंद केंद्रे |
| ७७. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७८. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७९. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ८०. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ८१. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ८२. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ८३. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ८४. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ८५. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८६. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८७. | स.स. श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| ८८. | स.स. श्रीमती मुल्ला सलीमा बेगम खाजोददीन |
| ८९. | स.स. श्रीमती शोभा गरुलिंगअप्पा बुरांडे |
| ९०. | स.स. श्रीमती सलीमा बाबुभाई कुरेशी |
| ९१. | स.स. श्री.जंजाळ राजेंद्र हिम्मतराव |
| ९२. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ९३. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ९४. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे

१. श्री.शेख अब्दुल ताहेर अब्दुल करीम
२. श्री.घोडके कचरु छगनराव
३. श्रीमती आऊलवार सुनिता तुकाराम
४. श्री.कांबळे चेतन जनार्धन
५. श्री.चंदु किशनचंद तनवाणी

(स.सदस्या श्रीमती माधुरीताई देशमुख यांचे आईचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दाजंली अपर्ण करण्यात आली.)

श्री.अब्दुल नाईकवाडी :पाणीप्रश्नावर चर्चा करावी.

श्रीमती मनीषा मुंढे :सहा दिवसापासून वार्डात पाणी नाही.अनेक समस्यांना तोंडद्यावे लागत आहे.

मा.महापौर :सर्वप्रथम दिपावली निमित्त सर्वांना सुभेच्छा तसेच महापौर पदाच्या कार्यकाळात सर्व पक्षाचे पदाधिकारी स.नगरसेवक,अधिकारी,कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. त्याबध्दल सर्वाचे ऋण व्यक्त करतो. आता पाणीप्रश्न या विषयावर चर्चा करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :दिपावलीचा महत्वाचा सण आहे. पाण्यासाठी नागरीकांना त्रास होत आहे. पाण्याची समस्या सोडवावी.

श्री.अफसर खान :जायकवाडी धरणात भरपूर पाणी आहे परंतु शहरात काही ठिकाणी ३,५,८ दिवसाआड पाणी येते. समान पाणी वाटप करावे. भेदभाव करीत असेल तर संबंधीतांवर कार्यवाही करावी.

श्री.शिवाजी दांडगे :पाण्यासाठी नागरीकांनी अंदोलन केले होते. त्यावर प्रशासनाने काय उपाययोजना केली.

श्री.फेराज खान :जुन्या शहरात पाणी देण्यामध्ये मोठा खंड पडत आहे. भेदभाव केला जातो. सर्व भागात समान पाणी वाटप करावे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :पाण्याची वेळ बरोबर नसते. समांतर योजना गेली. तेव्हा प्रशासन पाणी देण्यास सक्षम आहे. असे म्हटले होते परंतु २-५-८-१० दिवसा आड पाणी येते नियोजन होत नाही. समान पाणी द्यावे. जायकवाडी धरणात भरपूर पाणी असतांना पाणी देऊ का शकत नाही.

श्री.शेख जफर :नियमीतपणे पाणी मिळाले पाहिजे.

श्रीमती मनीषा मुंढे :एन-३,४ ते चिकलठाणा पर्यतच्या भागात ५-६ दिवसा आड पाणी येते. नियोजन का होत नाही?

श्रीमती समीना शेख :पाणी प्रश्नावर विशेष सभा लावावी. स्थायी समितीच्या सदस्यांनी मागणी केली होती. सभा आयोजित केली नाही.

श्री.शेख जफर :माझे वार्डात ९ दिवसापासून पाणी आले नाही, मुस्लीम वस्तीमध्ये असे का होत? सर्व वार्डात समान पाणी मिळावे. नागरीक आमच्या घरी प्रश्न घेऊन येतात आम्ही त्यांना काय उत्तर द्यावे.

श्रीमती सिमा खरात :जलवाहिनीच्या कामासाठी शटडाऊन केले. त्यानंतर घाण पाणी दिले गेले. धरणात मुबलक पाणी साठा असतांना पाणी मिळत नाही. आजही वार्डात एफ व सी सेक्टरला पाणी देण्यासाठी गॅप दिला. दिवाळीच्या सणामध्ये गॅप देणार असेल तर योग्य नाही.

श्रीमती मिना गायके :माझे वार्डात ७ दिवसापासून पाणी नाही.

श्रीमती शोभा वळसे :पाणी पुरवठा करणेस गॅप दिला. त्यामूळे नागरीक आमच्या घरी येऊन विचारणा करतात.

श्रीमती ज्योती अंभग :रमाई आवास योजनेतून माझे वार्डात घरे दिलेली आहे. त्या लोकांना शिप्ट केले. तेव्हा सर्व सुविधा देऊ असे म्हटले होते. तेथे २० हजार लि.चे टँकर येत होते. ते १५ दिवसापासून कुणाच्या सांगण्यावरून बंद केले.

श्री.सिताराम सुरे :एक महिन्यापासून पाणी प्रश्न चालू आहे. एक वर्षात तीन वेळेस शट-डाऊन घेतले. तरी सुध्दा ६-६ दिवस पाणी येत नाही. आता सांगतात तीन दिवसा आड पाणी द्यावे लागणार. चार वर्षापासून २ दिवसाआड पाणी केले. १५५ एमएलडी पाणी शहरात येते त्यापैकी ३५-४० एमएलडी पाणी एन-५ च्या

टाकीवर येते बाकीचे पाणी कुठे जाते. सिडको हडकोच्या नागरीकाना वेठीस धरले जात आहे. नियोजन केंव्हा करणार आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:माझे वार्डातील टाकी भरली जात नाही. वार्डातील नागरीक १०० टक्के टॅक्स भरतात.

श्री.सचिन खैरे :हनुमान टेकडीची टाकी भरत नाही. सम करण्याची कार्यवाही करावी टेकडावर पाणी जात नाही. त्यामूळे पाणी येत नाही.

श्रीमती सुरेखा सानप :ब्रीजवाडी तसेच नारेगाव राजेंद्रनगर भागातही सहा दिवसापासून पाणी नाही.

श्रीमती ज्योती नाडे :टाकीची लेव्हल येत नाही. सहा दिवसापासून वॉर्डात पाणी नाही. नियोजन केले जात नाही.

श्रीमती कमल नरोटे :रेग्यूलर पाणी येणार असे पेपरला आले होते. १० दिवस झाले. ५-६ व्या दिवशी पाणी येत नाही

श्रीमती शेख नरगीस :शहरातील ६०-७० टक्के भागात २ दिवसा आड पाणी, बाकीच्या ठिकाणी ३ दिवसा आड ६ दिवसा आड पाणी येते. २ दिवसा आड येणारे पाणी रेग्युलर दिले जाते. पुर्ण शहरास समान पाणी द्यावे.

श्रीमती समीना शेख :समान पाणी द्यावे मी पत्र दिले होते तरी पक्षपात होत आहे. समान पाणी वाटप का होत नाही?

श्रीमती शिल्पाराणी वाडकर:ज्या वार्डात वसुली कमी तेथे पाणी जास्त येते.

श्री.जमीर कादरी :शटडाऊन होते म्हणून अडचण दाखवित आहे. १० दिवसापासून वार्डात पाणी नाही. प्रत्येक वार्डात समान पाणी द्यावे नियोजन करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्वच भागात पाणीपुरवठ्याची समस्या आहे. वसुलीकडे लक्ष कुणी देत नाही. जेथे वसुली जास्त तेथे जास्त पाणी द्यावे.

श्री.अजीम अहेमद :स्लम भाग गरीब वसाहतीत पाणी देत नाही.

या वेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलतात.

श्री.राजगौरव वानखेडे :ज्या भागात नागरीक टॅक्स भरतात. त्यांना जास्त पाणी द्यावे. समान पाणी वाटप करणे योग्य नाही. सभागृहात बोलल्यानंतर याचा त्रास काही सदस्यांना का होतो?

(या वेळी डायस समोर अनेक सदस्य एकाच वेळी जमा होतात व एकत्रित बोलत असतात.काही सदस्य राजदंड ओढण्याचा प्रयत्न करतात. खुर्च्या फेकतात. सुरक्षा रक्षकास बाजुला करण्याचा प्रयत्न करतात.)

मा.महापौर :स.सदस्य श्री.सय्यद मतीन रशीद तसेच श्री.शेख जफर यांचे सभासदत्व रद्द करण्यात येते. त्यांचेवर गुन्हे दाखल करण्यात यावे. पोलीसांना सभागृहात प्राचारण करण्यात येते. त्यांनी त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.गोकुळसिंग मलके :असे वर्तन करणे बरोबर नाही. त्यांचेवर त्वरीत गुन्हा दाखल करावा.

मा.महापौर :श्री.अजीम अहेमद श्री.सयद मतीन रशीद व श्री. शेख जफर यांचे सभासदत्व कायमस्वरूपी रद्द करण्यात येते व त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

श्री.अफसर खान :एक दिवसासाठी ठिक आहे. कायमचे सभासदत्व रद्द करू नये.

श्री.प्रमोद राठोड :त्यांना बाहेर काढावे.

मा.महापौर :सभा १० मिनिटासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ ३-१७ वाजता पुन्हा सभा ३-२७ वाजता सुरूवात)

श्री.रेणुकादास वैद्य :असे बेशिस्त वर्तन करणे योग्य नाही. त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :कायमस्वरूपी सदस्य रद्द करण्यात यावे व शासनाला शिफारस करावी.

श्री.नासेर सिध्दीकी :अजीम अहेमद यांची चूक नाही त्यांचे रद्य केलेले सभासदत्व मागे घ्यावे.

मा.महापौर :स.सदस्य यांनी मत व्यक्त केले. त्यानुसार स.श्री.अजीम अहेमद यांचे सभासदत्व कायम ठेवण्यात येते ते सभागृहात आले तरी चालेल. परंतु श्री.सयद मतीन रशीद व श्री शेख जफर यांचे कायमस्वरूपी सभासदत्व रद्द करण्यात येते व तसा अहवाल प्रशासनाने शासनास पाठवावा. यांचेवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिलेले आहे. त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

श्रीमती माधुरी देशमूख :जो प्रकार घडला. त्याचा निषेध करते. पाणी पुरवठ्या बाबत कार्यकारी अभियंता यांचेकडून खुलासा घ्यावा.

श्री.जहागीर खान :पाणीपुरवठा सुरळीत असता तर असा प्रकार सभागृहात झाला नसता. सदस्यांना जनतेने निवडून दिले. समस्या मांडाव्याच लागतात. पाणी प्रश्न समस्या सोडवाव्यात.

श्री.नासेर सिध्दीकी :सर्व शहरात समान पाणी देऊ शकतो की नाही? माहिती घ्यावी.

श्रीमती माधुरी देशमुख :न्यायमुर्तीनगर, उच्च न्यायालय व सिडको ऑफिस येथे किती वेळ पाणी दिले जाते?

कार्य.अभियंता-(पापू) :५० मिनिटे ते एक तास पाणी देतो. ज्या भागांचा उल्लेख केला आहे त्यांची माहिती मागीतली जाईल.

श्रीमती माधुरी देशमुख :त्या ठिकाणी दररोज दोन तास पाणी पुरवठा होतो. मी मनपातून रेकॉर्ड काढला आहे. तेथे एवढी नागरी वस्ती नाही. तरी एवढे पाणी का दिले जाते? जेथे टॅक्स भरला जातो. तेथे पाणी दिले जात नाही.

कार्य.अभियंता (पापू) :दररोज पाणीपुरवठा कुठेही होत नाही.त्या भागात गल्ल्या असेल त्या भागातील पाणीपुरवठा करण्याची वेळ ठरावीक आहे. समांतर योजना झाल्यानंतर पाणी पुरवठा सुरळीत होईल.

श्रीमती माधुरी देशमुख :एन-५ टाकीवर शेजारी छोटी रूम कशासाठी बांधली आहे.

कार्य.अभियंता (पापू) :कर्मचारी बसण्यासाठी आहे.

श्रीमती माधुरी देशमुख :ॲडीशनल पाणी क्युरीफिकेशनचे मशीन बसविले आहे. ते २०१२ पासून बंद आहे. देखभाल होत नाही. हे मशीन चालू असते तर घाण पाणी येत नाही. ते मशीन सुरू करण्याचे आदेशीत करावे. पुंडलिकनगर टाकीवर गॅप दिला व एन-५ टाकीवर पाणी देणार होते. ते आले नाही. तर पाणी गेले कुठे? आम्ही प्रश्न मांडतो सुटत नाही तोच तो मुद्दा उपस्थित करावा लागतो हे योग्य नाही. जेथे समान पाणी वाटप करण्याची मागणी होते तेथे वसुली किती होते? ते ही सांगावे.

श्री.राजेंद्र जंजाळ :धरणात पाणी असतांना पाणी देऊ शकत नाही. जायकवाडी ते नक्षत्रवाडी पर्यंत लाईन टाकण्याची मा.न्यायालयाची परवानगी घ्यावी. असा ठराव घेतला आहे. त्या लाईनची परीस्थिती काय? त्यातून लागेल तेवढा पाणी आणू शकतो का? सर्व सांगावे ६००० ठिकाणी वेल्डींग केली. व्यास तीचा कमी झाला. समांतर लाईन टाकली नाही तर काय परीस्थिती होणार आहे.

| | |
|---|---|
| श्रीमती मनिषा मुंढे | :वार्डात आठ दिवसापासून पाणी येत नाही. फोन अधिकारी घेत नाही. नागरीक आमच्या घरी पाण्याची समस्या घेऊन घरी येतात. |
| कार्य.अभियंता (पापू) | :काल दुपारी २ ते ११-३० वाजेपर्यत विद्युत पुरवठा नव्हता. त्यामुळे ८,९ तारखेला गॅप पडलेला आहे. त्यामूळे पाणी येण्यास व्यत्यय झाला आहे. ५६ एमएलडी पाणीची स्कीम ७४ मध्ये झाली. १०० एलएलडीची स्कीमला ४० वर्ष झाले. दोन्ही योजना कालबाह्य झाल्या. लाईनची जाडी ९ एमएम वरून ६ एमएम झाली. वारंवार पाईपची वेल्डींग करून पाणीपुरवठा करावा लागत आहे. पाणीपुरवठा योजनेचे टेंडर काढले होते. परंतु काही कारणास्तव ते काम झाले नाही. आता शासनाची परवानगी घेऊन योजनेचे काम करावे लागेल. तोपर्यत पाणीपुरवठा सुरळीत होणार नाही. सिडकोच्या टाकीवर ५६ ते ६० एमएलडी पाणी येते. |
| श्री.सितांराम सुरे | :एन-५ टाकी वर ३५-३७ एमएलडी पाणी येते. तेथून एन-७ टाकीवर २०-२२ एमएलडी पाणी येते. अधिकारी यांनी चुकीची माहिती देऊ नये. |
| श्रीमती समीना शेख | :किती दिवसाआड पाणी देऊन समान पाणी देऊ शकतो. |
| कार्य.अभियंता (पापू) | :योजनेचे काम होईल तेंव्हा समान पाणी देऊ शकतो. |
| श्री.दिलीप थोरात | :वसुली त्याप्रमाणे समान पाणी वाटप करावे |
| कार्य.अभियंता (पापू) | :जेथे जास्त गॅप देऊन पाणी मिळते. त्यावेळी विद्युत पुरवठा खंडीत झालेला असेल त्यामूळे अशी परीस्थिती होते. काही वेळा विद्युत पुरवठा खंडीत असेल तर सदस्य सांगतात की, आता पाणी सोडू नये. दिल्ली गेट शहांगज जिन्सी टाकीची क्षमता कमी झाली. त्यामुळे पाणीपुरवठा २, ३ दिवसा आड देऊ शकत नाही. तेथे पाणी खंडीत झाले आहे. |
| मा.महापौर | :किती वार्डात ५,७,९ दिवसाआड पाणी मिळते. |
| श्रीमती समीना शेख | :आमच्या वार्डात ८ दिवसाआड पाणी येत आहे. जिन्सी टाकीवरून ५-६ वार्डास पाणी जाते. |
| श्री.फेरोज खान | :माझ्या वॉर्डात ६-७ दिवसानंतर पाणी येत आहे. जुन्या शहरातच असे का होते? बाकी वार्डात एक दिवसाआड पाणी येते. |
| मा.महापौर | :विशिष्ट वार्डातच पाणी पुरवठा का होत नाही. उपाय काय केले? |
| कार्य.अभियंता (पापू) | :समांतर होत नाही. तोपर्यत पाणीपुरवठा सुरळीत होणार नाही. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :समांतर लाईन होत नाही. तोपर्यत पाणीपुरवठा सुरळीत होणार नाही ही सत्य परीस्थिती आहे. या साठी प्रशासनाने काय कार्यवाही केली? |
| श्री.नासेर सिध्दीकी | :समान पाणी देण्याचे सुचना कराव्यात. |
| श्री.शिवाजी दांडगे | :समान पाणी वाटपाला माझा विरोध आहे. |
| श्री.राजू शिंदे | :जेथे ५-५, ६-६ दिवसाआड पाणी येते. तेथे वाढीव पाणी देण्याचे नियोजन का होत नाही? समांतर टाकणेसाठी काय प्रयत्न केले? समांतर झाली तर २४ तास पाणी येणार होते. अडचणी काय? त्या सांगाव्यात. ६७-३-सी मध्ये अनेक कामे केले तरी अडचणी आहेतच. टाक्या का भरत नाही? |
| कार्य.अभियंता (पापू) | :विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होतो २४ तास विद्युत पुरवठा करणेसाठी एमएसईबी ने २५ लक्षची डिमांड केली त्यांना धनादेश दिला आहे. फारोळा |

येथे विद्युत पुरवठा कायम करणेसाठी काम चालू केले. काही लोक वॉल सोडून पाणी घेतात.

श्री.फेरोज खान :सक्षम अधिकारी पाणी पुरवठयासाठी द्यावे.

श्री. राजू शिंदे :जे वॉल खोलतात त्यांचेवर गुन्हे दाखल करावे. सिडको-हडको भागातील पाण्याची डिमांड किती आहे? किती पाणी दिले जाते?

श्री.जमीर कादरी :सर्व भागात समान पाणी मिळावे.

कार्य.अभियंता (पापू) :सिडको-हडको भागासाठी १०० एमएलडीची डिमांड आहे. पुर्ण शहराची ३०० एमएलडीची आहे. दोन दिवसाआड पाणी देतो.

श्री.राजू शिंदे :चर्चा करून उपयोग नाही. श्री.चहल यांना पाणी पुरवठा संबंधी माहिती नाही.

श्रीमती सिमा खरात :पाणी देण्याला गॅप असेल तर किती वेळ आधी कळविण्यात येते? वार्डात एफ सी सेक्टर मध्ये १ वाजता पाणी येणार होते. १ वाजताच लाईनमन कळवितात आता पाणी येणार नाही. हे योग्य नाही.

श्री.अब्दुल नाईकवाडी :२५ टक्के पाणी रस्त्यावर वाहते. अनेक भागात नागरीक तोटी लावत नाही. काही भागात जास्तीचे पाणी असेल तर नागरीक ड्रेनेज मध्ये टाकतात. काही ठिकाणी खड्डे खोदून पाणी घ्यावे लागते. ही परीस्थिती बदलली पाहिजे. एक समान पाणी द्यावे.

श्री.राजू शिंदे :लाईन मन संपावर जाणार आहे. त्याचे सुट्टीचा १०५ दिवसाचा पगार दिला जात नाही. या बाबत कार्यवाही का होत नाही?

कार्य.अभियंता (पापू) :संचिका आस्थापना विभागास पाठविली आहे.

या वेळी महिला सदस्या डायस समोर जाऊन पाणी सुरळीत करण्याची मागणी करतात.

मा.महापौर :अनेक भागात पाण्याची समस्या आहे. काही ठिकाणी ६,७,८,९ दिवसा आड पाणी येते. हा प्रश्न प्रशासनाने गार्भीर्याने घ्यावा. यावर अनेकदा चर्चा झाली. त्यात सुधारणा झाली नाही. अनेक वेळा टाकीवर जाऊन धरणे अंदोलन करावे लागते. जेथे दोन दिवसा आड पाणी येत नाही. ५,६,७,८ दिवसा आड पाणी येते अशा भागाची शहर अभियंता, श्री.कोल्हे कार्य.अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी करून माहिती घ्यावी व तेथे पाणीपुरवठा सुरळीत करावा.

श्री.गोकुळसिंग मलके :४-५ दिवसापासून कचरा विषय गंभीर झाला. गावातील लोकांनी नारेगाव येथे कचरा टाकू नये म्हणून अंदोलन केले. त्या बाबतीत काय निर्णय घेतला?

श्री.राजू शिंदे :१३ गावच्या लोकांनी जन आंदोलन केले. तीन दिवस कचरा शहरात पडून होता. मा.उच्च न्यायालय, शासन व प्रदुषण मंडळ तसेच एअरपोर्ट ऑथर्टीने वारंवार सांगून सुध्दा मनपाने नारेगाव कचरा डेपो हलविला नाही. नागरीकांनी आंदोलन केले. कचरा गाड्या येऊ दिल्या नाही. परीस्थिती गंभीर झाली होती. आपण विनंती केली, तरी ते लोक ऐकायला तयार नव्हते. या कचऱ्यामूळे घाण पसरली. तेथे माशा, डास आहे. बाजूला शाळा आहे चार मुलांना अंधत्व आले. २००० कुत्रे तेथे असतील. सर्व घाण तेथे आणून टाकतात. शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली. जात नाही. प्रत्येक वार्ड-वाईज कचरा विल्हेवाट लावली जावी. या आंदोलनामध्ये मा.विधानसभा अध्यक्ष यांनी मध्यस्ती केली. त्यांनी त्या आंदोलक नागरीकांना शब्द दिला की, यासाठी लवकरच नियोजन केले जाईल. त्यामुळे ते लोकांनी ऐकले व तीन महिन्यात सर्व व्यवस्था करावी लागणार आहे.

एस.आय.ची मदत घ्यावी. प्रत्येक वार्डात मशीनरी ठेवून कचऱ्याची विल्हेवाट त्या त्या वार्डातच लावावी. यासाठी नियोजन करावे.

श्रीमती सुरेखा सानप :कचऱ्याची गाडी जाऊ दिली नाही तर काय परीस्थिती होईल? तेथे बाजूला माझा वार्ड आहे. लाईट लावले जात नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :ही समस्या शहराची आहे. सोडवणे महत्वाचे आहे. सर्व कचऱ्याचे निर्मुलन होणे अपेक्षीत आहे. सन-२०१३ मध्ये मा.कोर्टाने निर्णय दिला. आतापर्यत कार्यवाही का केली नाही? जे अधिकारी यापुर्वी काम करीत होते. त्यांनी काय कार्यवाही केली? आता त्या लोकांना शब्द दिला. तीन महिन्यात कार्यवाही करावी लागेल. कचरा विल्हेवाट करण्याबाबत नियोजन करावे प्रश्न सोडवावा.

श्रीमती अंकिता विधाते :तीन महिन्यात काय नियोजन करणार आहे?

मा.आयुक्त :शहरातील जवळपास ३७० टन कचरा जमा होतो. वर्गीकरण करून सुका व ओला कचरा ८० वार्डात होतो. हा कचरा एकत्रित करून नारेगाव डेपोत टाकतो. वर्गीकरणासाठी नागरीकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. स्मार्ट सिटीच्या माध्यमातून २ लक्ष बिन्स घेणार आहोत. त्या वाटप करणार आहे.

श्री.राजू शिंदे :चार-पाच वार्डातच वेगळा कचरा होत असेल.

श्री.रेणुकादास वैद्य :सुका-ओला कचरा वेगळा केला जातो. पुन्हा तो वाहून नेतांना गाडीमध्ये एकत्र होतो. त्याचे नियोजन करावे.

श्री.राजू शिंदे :झोन वाईज मशीन बसवून योग्य तो प्रयोग करून कार्यवाही करावी. आजच त्यास मंजूरी घ्यावी. १०० टक्के गाड्या बंद होणार नाही. परंतु कालातंराने तेथील कचरा कमी करता येईल.

श्री.शिवाजी दांडगे :माझे वार्डात कचरा प्रोसेस प्रक्रिया होते. ६८ टन खत उपलब्ध केले. आता जागा नसल्याने ते काम थांबवावे लागले. सेग्रीकेशन केल्यानंतर जो प्लास्टीक पुठ्ठा निघतो तो सीआरटी मार्फत कॅन्टॅकला सेन्ट्रल नाका येथे दिला जातो. त्यांना एनओसी दिली नाही. तो प्लॅन्ट बंद होईल. पुन्हा कचरा कुठे टाकावा? असा प्रश्न पडेल. अनेक प्रोजेक्ट शहरात येऊन गेले त्यांना जागा देऊ शकलो नाही. अशा प्रोजेक्टला एनओसी द्यावी. काही प्रोजेक्ट असे होते की, ते खत विकत घेण्यास तयार होते. त्यांचेशी चर्चा करण्यास तयार नाही. प्रत्येक वार्डासाठी सेग्रीकेशन त्यासाठी काय उपाय केले? माझे वार्डात श्री.कुलकर्णी यांनी एक मशीन निर्मिती केली होती त्यातून खत तयार करून शेतकऱ्यांना देत होतो. ती मशीन विकत घेतली नाही. त्यांनी निर्माण केलेल्या मशीन इतर शहरात चालू आहे आपणच का विकत घेत नाही.

श्रीमती माधुरी देशमुख :दररोज कचरा उचलला जात नाही. कचरा वेगळा केला जातो. परंतु तो गाडीत एकत्र होतो. माझे वार्डात रोज कचरा संकलन होत नाही.

श्री.राजू शिंदे :जर त्या मशीनरी बसविणार असेल, तर आम्ही स्वेच्छा निधीतून घेण्यास तयार आहोत. तीन महिन्यात कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावायची आहे याची दखल घ्यावी. आमचे काय योगदान पाहिजे ते सांगावे. प्रशासनाचे सहकार्य अपेक्षीत आहे. २-४ दिवसात कार्यवाही करावी.

मा.आयुक्त :गाड्यांमध्ये तशी व्यवस्था केली जाईल. ओला कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी वार्डात व्यवस्था केली जाईल. जागा घेऊ व सर्वच कचरा वार्डातच कसा

जिरवता येईल यासाठी मास्टर प्लॅन तयार करून कार्यवाही होईल व सभेची मान्यता घेतली जाईल.

श्री.राजू शिंदे :दोन दिवसात कार्यवाही करावी. ६७-३ सी मध्ये काम केले तरी चालेल. किती खर्च होतो. वाहतूकीचा खर्च किती ते सांगावे?

श्री.राजेंद्र जंजाळ :दोन-दोन वार्ड मिळून कचऱ्याचे विघटन करणारी मशीनरी मिळवून दिली तर काम होईल. दुरवर कचरा घेऊन जाण्याची वेळ पडणार नाही. वाहतुकीचा खर्च वाचेल हे करणेसाठी जागा शोधाव्यात. मनपाच्या जागा आहेत का ते पहावे. सर्वाशी चर्चा करावी. योग्य तो वेळीच निर्णय घ्यावा.

मा.आयुक्त :६० कोटी वर्षाचा खर्च आहे

कार्य.अभि.श्री.कोल्हे :वर्षाला ८.५० कोटी खर्च होतो.

श्री.राजू शिंदे :चुकीची माहिती देऊन नये. यापेक्षा जास्त खर्च होतो. अधिकारी यांना माहिती नसते लेखी काहीच आणत नाही.

मा.आयुक्त :चीनचे चार अधिकारी शहरात आहे. त्यांना डेपोमध्ये घेऊन गेलो होतो. पाहणी केली. जो सत्यम फर्टीलायजरचा प्लॅन्ट आहे त्याची पाहणी केली. ज्यामध्ये २००७ मध्ये लॅण्ड फिट साईट करून आतमध्ये कचरा टाकला होता. ते पाहणी केली जागा किती शिल्लक आहे पाहणी केली. या कंपनीने हा कचरा शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावू शकतो. अशी इच्छा व्यक्त केली. त्यांना डीपीआर तयार करण्यास सांगितले तो आज तयार होईल. उद्या त्या कंपनीचे प्रेझेन्टेशन आहे. सर्वानी तेथे यावे. त्यानंतर आपण पाऊल उचलू. तसेच वार्डातील कचरा खत तयार करण्यासाठी मशीन बसवू. ज्या सोसायट्यांमध्ये १०० कि.कचरा जमा होतो. त्यांनी स्वतंत्र व्यवस्था केली तर त्यांना करामध्ये सवलत वगैरे देता येईल का? याची तपासणी होईल व हा सर्व प्रोग्राम दोन अडीच महिन्यात करू.

श्री.राजेंद्र जंजाळ :दोन तीन वार्डाचा ओला व सुका कचरा तेथेच डिस्पोजल करता येतो का? ते पहावे. तशी मशीनरी खरेदी करावी. वाहतुकीचा खर्च वाचेल. जे २००-३०० घराची स्किम असेल त्यांना परवानगी देतांना कचरा तेथेच विघटन करावा. अशी नियमावली तयार करावी.

श्रीमती अंकिता विधाते :जाधवमंडीच्या मागे कम्पोस्ट खत करणेसाठी खड्डा करून तेथे ओला कचरा टाकला. ते बंद केले आता तेथे कचरा टाकला जातो. आता नागरीकांना त्रास होत आहे. आतापर्यत कम्पोस्टसाठी खड्डे केले किती खत तयार केले?

मा.आयुक्त :कचरा प्रक्रिया करणारे वेगवेगळ्या कंपनीशी चर्चा चालू आहे. व्हिजीटेबल वेस्ट साठी एक इनडिपेंडंट मशीन असते अशा प्रकारचा प्लँट आहे. टाटाच्या सहकार्याने राबविणार आहे. त्याची किमंत १५ लक्ष खर्च आहे. सीएसआरच्या माध्यमातून १० टक्के मदत होईल. १५ दिवसाच्या आत तो कार्यान्वित होईल. कचरा टाकलेला आहे कम्पोस्ट झाला नाही. याची शास्त्रोक्त पध्दतीने कंपनीशी चर्चा करून विल्हेवाट लावली जाईल.

श्री.राजू शिंदे :प्रत्येक वार्डात मशीनरी घेऊन कार्यवाही करावी. संपर्ण वार्डात २५ कोटीमध्ये खर्च होत असेल तर योग्य आहे.

श्रीमती अंकिता विधाते :वार्डात लेबर वाढवून द्यावे.

मा.महापौर :ग्रामीण भागातील व नारेगाव लोकांनी अंदोलन उभे केले होते. नारेगाव येथे कचरा टाकणे बंद केले होते. सर्वानी त्यांना समजाविण्याचा प्रयत्न केला ते ऐकत नव्हते. इतर ठिकाणी जागा पाहिली तेथे विरोध झाला. जेथे गेलो तेथे विरोध होत होता. ऐन दिवाळीत हा कचरा कुठे टाकायचा असा प्रश्न निर्माण झाला होता. अशा वेळी मा.विधानसभेचे अध्यक्ष मा.हरीभाऊजी बागडे साहेब यांनी मध्यस्थी केली. त्या लोकांशी चर्चा केली व हा प्रश्न सोडवला. त्याबद्दल मा.श्री.हरीभाऊजी बागडे साहेब यांचे आभार व धन्यवाद देतो. आता तेथील कचऱ्याची आपल्याला तीन महिन्यात विल्हेवाट लावायची आहे. तसे आश्वासन दिले आहे. हा प्रश्न प्रशासनानेही गांभीर्याने घेतला नाही. तेथील लोकांचे जीवनमान मुश्कील झाले तेथील पाणी सुध्दा दुषीत आहे. अनेक वेळा चर्चा झाली. उपाय काहीच केले नाही. आपण कमी पडलो असे त्या लोकांना सांगावे लागले. आता थांबता येणार नाही. ओला-सुका कचरा वेगळा करावा. त्यानुसार त्याची विल्हेवाट लावावी. काही वार्डात कचऱ्यापासून कम्पोस्ट खत तयार होते. चागंली प्रगती तेथे आहे. तेथील स्वच्छता निरीक्षक चांगले काम करीत आहे. सन्मान केला पाहिजे. त्यांना प्रोत्साहन पर काही देता येईल का ते करावे. कचरऱ्याची विल्हेवाट करण्यासाठी अनेक टेक्नॉलॉजी आहे. खत तयार करता येते. वास येत नाही प्रदुषण होत नाही. तो प्रयोग शिवाजी दांडगे यांचे वार्डात चालू आहे. काही मशीनरी यांना इलेक्ट्रीक लागत नाही. मॅगनीटवर चालतात. कचरा टाकला तर हॅश तयार होते. ते रस्ते तयार करणेस वापरू शकतो. विज तयार होते. वार्डातील लाईट लागू शकतात. कपोस्ट खत तयार करता येत होते. पुणेला या मशीनरी आहेत. राम भोगले साहेबांनी प्रयोग यशस्वी केले. ६० कोटीचा आता खर्च होतो आहे. काही कंपनी शासनाची मदत होणार आहे. या प्रोजेक्टला शासन अनुदान देऊ शकेल. प्रशासनाने कार्यवाही करावी. मिशन म्हणून काम केले जावे. आपले शहर स्वच्छ झाले पाहिजे कचरा मुक्त व्हावे. यासाठी प्रयत्न करावे. ओला सुका कचरा करणेसाठी जनजागृती करावी. कचरा जमा करण्याची वेळ निश्चित करावी. या कचऱ्याची जागेवरच विल्हेवाट लावली तर वाहतूकीचा खर्च वाचेल जी मदत लागेल ती करता येईल. हा प्रोजेक्ट लवकर मार्गी लावावा. नारेगावचा डंपीग होत असलेला कचरा बंद कसा होईल? तशी कार्यवाही करावी.

श्री.अफसर खान :श्री.विटेकर काम करीत नाही. फोन केला तर जागेवर येत नाही. देखभाल दुरूस्तीच्या कामाच्या संचिका थांबवून ठेवतात. संचिका सापडत नाही सांगतात. काम करीत नाही. त्वरीत बदली करावी असे सांगतो तरी बदली का होत नाही. वार्डाचे सर्व सदस्य व सभापती यांनी मागणी केली तरी बदली होत नाही.

मा.आयुक्त :श्री.विटेकर यांचे काम काय? ते का काम करीत नाही? त्याचा अहवाल शहर अभियंता यांनी द्यावा. त्यानुसार कार्यवाही होईल.

मा.महापौर :शहर अभियंता यांनी चौकशी करावी. काम करीत नसेल तर ८ दिवसात कार्यवाही करावी.

श्रीमती अंकीता विधाते :माझे वार्डात ५० लाईट बंद आहेत. वारंवार मागणी करूनही कार्यवाही होत नाही. ठेकेदार काम का करीत नाही. सेन्ट फ्रांन्सिस शाळेसमोर लाईट बंद आहे.

कार्य.अभियंता-विद्युत :दिपावलीच्या अगोदर लाईट लावण्याचा प्रयत्न करू. सर्व ठेकेदारास कामास लावले जाईल.

श्री.सिताराम सुरे :बोगस लाईट लावले जातात. सकाळी लावलेला लाईट सायंकाळी बंद होतो.

कार्य.अभियंता-विद्युत :तसे होत नाही. होत असेल तर कार्यवाही होईल.

श्री.अब्दुल नाईकवाडी :वार्डात लाईटचे काम करतेवेळी सदस्यांना कल्पना देत नाही. चिश्तिया चौक ते बजरंग चौक, सेन्ट्रल नाका ते जळगाव रस्ता पर्यत लाईट बंद आहे.

श्री.मनोज गांगवे :जी.आय पोल लाईट लावायचे. असतील तर अंदाजपत्रक तयार करीत नाही.

कार्य.अभियंता-विद्युत :ज्या ठिकाणी पथदिव्याची व्यवस्था नाही. तेथील अंदाजपत्रक करण्यास बाधा नाही. जेथे एक्झेटिंग दिवे आहे. त्यास रिप्लेशमेन्ट करणेचे काम करण्यात येऊ नये असे आहे. कारण एलईडी दिव्याची वर्क ऑर्डर दिली आहे.

श्री.गजानन मनगटे :जर लाईट बंद असेल त्याचा पार्ट खराब झाला. असेल व एलईडीचे ठेकेदार काम लवकर करणार नसेल तर लाईट बंद ठेवणार काय? ३-४ वर्षापासून अटीची पुर्तता होत आहे. एक वर्षापासून वर्क ऑर्डर दिली. काम करण्यास एलईडी एजन्सी तयार नाही.

श्री.राजू शिंदे :एस्क्रो अकाऊंट ओपन केले की नाही. त्यांचे खात्यात पैसे टाकणार की नाही? काम सुरू होणार की नाही? माहिती द्यावी.

श्री.गजानन मनगटे :मनपाची आर्थीक परिस्थिती बघता व एस्क्रो अकाऊंट उघडल्यानंतर त्याचे अटी शर्ती कशा असतील सांगावे. दरमहा किती पैसे भरणार आहे? त्याचा परीणाम विकास कामावर होणार काय?

श्री.राजू शिंदे :सातारा-देवळाई साठी २००० लाईट देणार होते का लावले नाहीत?

कार्य.अभियंता-विद्युत :र.रु.२.७२ कोटी द्यावे लागणार आहेत. आता सध्या रु.२.५० कोटी खर्च करतो. एलईडीचे टेंडर काढल्यानंतर मा.कोर्टात काही कारणाने चॅलेंन्ज झाले मा.सर्वोच्च न्यायालयापर्यत प्रकरण गेले. मा.कोर्टाने वर्क ऑर्डर द्यायला लावली व त्यामध्ये असे की, एस्क्रो अकाऊंट काढून त्यामध्ये रु.८.५० कोटी भरायचे आहे. एकूण ४० हजार एलईडी फिटींग बल्ट बदलायचे आहे. ते बदलल्यानंतर त्यांनी आपल्या एनर्जी मीटर मध्ये सेव्हींग होईल त्याप्रमाणे पेमेन्ट करायचे. वर्क ऑर्डर देऊन वर्ष झाले एस्क्रो अकाऊंट ओपन केले नाही.

श्री.गजानन मनगटे :मा.कोर्टाच्या आदेशान्वये त्या ठेकेदाराला एवढी मोठी रक्कमद्यावी लागणार असेल व ११५ वार्डात विकास कामे थांबणार असेल तर ही बाब मा.कोर्टाच्या निदर्शनास आणूनद्यावे की विकास कामावर परीणाम होणार आहे एस्क्रो अकाऊंट उघडण्यात आले व त्यावर पैसे दरमहा टाकले. तर विकास कामावर परीणाम होणार नाही का?

श्री.राजू शिंदे :या बाबत विधी सल्लागार यांचे मत घ्यावे.

श्री.अफसर खान :कोणत्याही कोर्टात असे आदेश होत नाही की, हे करणे जरूरी आहे. दरमहा र.रु.२.७२ कोटी देऊ शकतो. अशी परीस्थिती मनपाची नाही. पुन्हा रिव्हयु

पिटीशन दाखल करावे, चांगले वकील लावावे व एलईडीचा ठेका रद्द करावा. एवढी रक्कम दरमहा देऊ शकत नाही. असे मा.कोर्टासमोर मांडावे.

मा.महापौर :विधी सल्लागार यांनी खुलासा करावा.

विधी सल्लागार :डिसेंबर २०१५ मध्ये एलईडी बाबतचा निर्णय झाला होता. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने ठराव घेतला की, हे करणे परवडत नाही. असे मा.कोर्टासमोर मांडावे. तसे मा.कोर्टासमोर सादर करण्यात आले की, हा केलेला करारनामा व एवढी रक्कम देणे परवडणारे नाही. सर्व उहापोह झाल्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने दोन्ही पीटीशन रिजेक्ट केले आहे.

श्री.गजानन मनगटे :वर्क ऑर्डर देण्याचे सांगितलेले आहे. आर्थीक परीस्थिती नसतांना त्यास पैसे द्यावे असे मा.कोर्टाच्या ऑर्डर मध्ये नाही. वर्क ऑर्डर घेऊनही त्यांनी काम केले नाही.

श्री.राजेंद्र जंजाळ :एस्क्रो अकाऊंट उघडणे. बाबत मा.कोर्टाचे आदेश आहेत का?

श्री.अफसर खान :कोणतेही कोर्ट असे आदेश देत नाही की, यांना ही रक्कम द्यावीच या प्रकरणात आपले विधी विभाग कमी पडला.

श्री.गजानन मनगटे :मनपाची आर्थीक परीस्थिती बघून निर्णय घ्यावा. मा.आयुक्तांनी असे म्हटले होते की, मनपाकडून एकही पैसा दिला जाणार नाही. स्मार्ट सिटी मधून काम करू. या एजन्सीला र.रु.२.७२ कोटी दरमहा दिले तर शहरातील विकास कामे होणार नाही. एस्क्रो अकाऊट ओपन करू नये. पैसे टाकू नये. दुसरे स्कीम मधून काम करावे. तसेच लाईटचे कामाचे अंदाजपत्रक थांबवू नये.

कु. सायली जमादार :सातारा देवळाई भागात एक महिण्यापासून ७० टक्के लाईट बंद आहे.

श्री.चेतन कांबळे :र.रु.८५ लक्ष वार्ड १३ साठी लाईट करीता मंजूर झाले. कामे होत नाहीत. दसरा पर्यत काम करतो असे सांगितले. होत नाही. एक्झीस्टींग नेटवर्क असतांना पोलवर लाईट का लावले नाही?

श्री.अप्पासाहेब हिवाळे :सातारा- देवळाई भागात लाईट लावावे.

कार्य.अभियंता-विद्युत :स्वत: पाहणी करतो माहिती घेतो. त्यानुसार पुढील कार्यवाही करता येईल.

कार्य.अभि.स्मार्टसिटी :टेंडर केले एजन्सी फिक्स झाली स्लम भागात इलेक्ट्रीक पोल नाही. एमएसईबीकडून पोल येत नाही. तोपर्यत लाईट लावले जात नाही. एक्झींस्टींग वर विद्युत प्रवाह घ्यावा. लागेल तेंव्हा लाईट लावता येईल.

मा.आयुक्त :आठ दिवसात काम करण्यात येईल.

श्री.चेतन कांबळे :मकई गेट, पानचक्की गेट, बारापुल्लागेट व लोखंडी पुल व या गेटचे परीसरातील १०० कोटीच्या रस्त्यामध्ये एकही रस्ता घेतला नाही. घरकुल साठी र.रु.५२ कोटी आले. सिमा कन्ट्रक्शन रु.५ टक्के रक्कम घेऊन काम करतो परंतु ते लाभार्थी सलेक्ट करीत नाही. त्यास काम न करता रक्कम देऊ नये. सिमा कन्ट्रक्शनचे काम बंद करावे.

श्री.गजानन मनगटे :एलईडी साठी शासनाकडून निधीची मागणी करावी व तसे मा.कोर्टाच्या निदर्शनास आणून द्यावे. त्यानंतर एलईडी लाईट लावण्याची कार्यवाही करावी. इतर लाईटची कामे थांबविण्यात येऊ नये.

कार्य.अभि.श्री.सिंकदर अली: स्मार्ट सिटी मध्ये स्मार्ट लाईट चे एक कॉन्फोडंट आहे. त्या स्मार्ट लाईटींग मध्ये ११२ कोटीचा प्रस्ताव तयार केला आहे. त्यामध्ये महापालिकेला

| | |
|---|---|
| | जवळपास ३७ टक्के सेव्हींग होणार आहे. यात मनपाचा फायदा होणार आहे व स्मार्ट सिटी मध्ये लाईटींगचे काम घेतले आहे. हा प्रस्ताव लवकर समोर येईल. जे पैसे भरायचे ते सर्व स्मार्ट सिटीच्या माध्यमातून काम होईल. |
| श्री.गजानन मनगटे | :लाईटच्या कामासाठी बजेट मध्ये पैसे आहे. अंदाजपत्रक का थांबविले. |
| शहर अभियंता | :र.रु.११२ कोटी एलईडीच्या प्रोजेक्टची मा.सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार वर्क ऑर्डर दिली. ते काम करणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी लाईट बदलायचे आहे ते थांबविले आहे. परंतु ज्या ठिकाणी अजीबात विद्युतव्यवस्था नाही तेथील कामाच्या नवीन संचिका करीत आहे. मा.कोर्टाचा अवमान ही होऊ नये एस्क्रो अकाऊंट उघडले म्हणजे एजन्सीला लगेच पैसे देतो असे नाही. काम झालेनंतर तीन महिन्यांनी त्यांचा पहिला हप्ता सुरू होणार आहे. या प्रोजेक्टचे काम पुर्ण होईल तेंव्हा जे बील आता येते ते डायरेक्ट र.रु.३७ लक्ष येईल जास्त बील झाले तर एजन्सीकडून वसुल करायचे आहेत. शहराचा विकासच करणार आहे. देखभाल दुरूस्तीचे जे टेंडर आहे ते कालातंराने बंद करणार आहे. कॉम्प्रेसिव्ह वर होत असलेला खर्च सुध्दा बंद होणार आहे. एजन्सी मेन्टेन करणार आहे लाईट बील कमी येणार आहे. जे लाईट बदलावे लागते ते बदलण्याची गरज नाही. सेव्हींग होणार आहे. मनपाचा फायदा होईल |
| मा.महापौर | :मा.कोर्टाचे आदेश त्या आदेशाचा अवमान होणार नाही. याची दखल घ्यावी तसेच अत्यावश्यक काम हे देखभाल दुरूस्तीमध्ये कामे करावी. मनपाचे जास्त पैसे सुध्दा खर्च होणार नाही. याची दखल घ्यावी. दोन्ही बाजूने पैसे खर्च करीत गेलो तर ते बरोबर नाही. अनेक वार्डात आता लाईट बंद आहेत. एजन्सीचे काम समाधानकारक नाही तक्रार आहे. अनेक ठिकाणचे लाईट बंद आहे ते चालू करावे. नियमानुसार कार्यवाही करावी. ज्या योजनेतून हे काम करता येत असेल त्यानुसार काम नियमानुसार काम करावे. |
| श्रीमती समीना शेख | :मागिल बैठकीत तापडीया डायग्नोस्टिक सेंटरचा विषय आलेला होता. स्थगिती दिली. त्या संबंधीची माहिती देणार होते मला मिळाली नाही. सुधारीत सर्व माहितीसह या बैठकीत प्रस्ताव आला नाही. एक वर्षापासून पेंडींग आहे. मालमत्ता मध्ये त्या इमारतीची डिटेल परवानगी बाबत माहिती नाही. करारनामा नाही. एक कर्मचारी निलंबीत होतो. पोलीसात केस होते. अनधिकृत पणे चालू आहे. भाडे वसूल केले नाही. करोडो रूपये बुडत आहे. |
| आरोग्य वैद्य.अधिकारी | :माहिती घेत आहे. पुढील सभेत प्रस्ताव येईल. |
| मा.महापौर | :सर्व माहिती घेऊन सादर करावे. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :डायग्नोस्टिक सेंटरच्या संदर्भात विषय चालू आहे. एक संचिका गहाळ झाली होती. त्याबाबतीत श्री.चंद्रशेखर सोनवणे नावाचे कर्मचारी यांना दोषी ठरवून निलंबीत केले होते. ती संचिका सापडली. ज्यात त्यांना दोषी ठरवून निलंबन केले होते. त्यांचे निलंबन मागे घ्यावे. |
| मा.महापौर | :आताच सुचना केल्यानुसार त्या प्रकरणात श्री.सोनवणे यांना निलंबीत केले होते. जर ती संचिका सापडली असेल तर प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करून त्यांचे निलंबन रद्द करावे. |

कु.सायली जमादार :मागिल बैठकीत ११५० विषय मंजूर केला. तो सिडकोचा निधी सातारा देवळाई साठी होता. रस्त्याचा विषय मंजूर केला. दोन्ही वार्डात समान न्याय दिला नाही. आता प्रस्ताव दिला आहे. तीन्ही ही रस्ते घेऊन अंदाजपत्रक तयार करण्याचे आदेशीत करावे. लक्ष्मीकॉलनीचा मुख्य रस्ता व आमदार रोडचे काम करावे.

मा.महापौर :ठराव मंजूर केला दुरूस्ती सुचविली होती अंदाजपत्रक तयार केले टेंडर झाले.

कु.सायली जमादार :सातारा येथील नागरीकांना न्याय का मिळत नाही. दुजाभाव केला जातो.

श्री.राजू शिंदे :डिफर वर २५ कोटीचे रस्ते सातारा देवळाई साठी घ्यावे ठराव केला होता त्यावर काय कार्यवाही केली. र.रु.५० कोटीचे डिफरचे रस्ते १०० कोटी बरोबर करणार आहे. त्यातून सातारा देवळाई साठी र.रु.२५ कोटीचे करावे.

मा.महापौर :डिफरच्या रस्त्यामध्ये सातारा देवळाईचे रस्त्याचे अंदाजपत्रक करावे.

कु.सायली जमादार :र.रु.८.५० कोटी निधी आहे तो समान द्यावा.

मा.महापौर :आमदार रस्त्यासाठी बजेट मध्ये तरतूद करून कार्यवाही करावी.

**<u>विषय क्रमांक १३१४:-</u>** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

श्री.नंदकुमार घोडेले :एका महिन्यामध्ये काय काम होते? टिप्पणी येत नाही.

मा.महापौर :प्रत्येक बैठकीच्या वेळेस कामाच्या प्रोग्रेस बाबत टिपणी द्यावी.

**<u>ठराव :-</u>**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक १३१५:-</u>** **(आस्थापना अधिकारी-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.एस.पी.खन्ना हे उप अभियंता म्हणून कार्यरत असतांना शासनाने औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्राथमिक सोयीसुविधांच्या विकास कामासाठी रु.२४.३३ कोटी निधी उपलब्ध करून दिला होता. तथापी, या निधीतून करावयाच्या कामांमध्ये निविदा प्रक्रियेच्या अटी/शर्ती CVC व PWD च्या Latest Guidelines/Norms चे उल्लंघन करणे, निविदा प्रक्रियेसंदर्भाने निर्गमीत शासन निर्णयातील तरतुदींचे उल्लंघन केल्याने निविदा दरांची स्पर्धा झाली नाही, अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१३% जास्त दराने प्राप्त झालेल्या दराचे कोणतेही तांत्रिक मुल्यांकन न करणे, प्राप्त दराबाबत बाजारभाव/या स्वरुपाच्या कामासाठी वर्तमान स्थितीत प्राप्त होणाऱ्या दरांसोबत तुलना न करता फक्त ठेकेदाराने दिलेल्या पत्राच्या आधारे ९.१३% ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराने निविदा मंजुर करण्याची शिफारस केल्यामुळे महानगरपालिकेचे रु.१.६७ कोटीचे आर्थिक नुकसान होणे इत्यादी गंभीर अनियमितता केल्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे.

वरील अनियमितता आढळून आल्यामुळे संबंधिताविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दिनांक ०९.०३.२०१७ रोजी दोषरोपपत्र बजाविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ (१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधीतांची वेतनश्रेणी रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६,६००/- अशी आहे.

करीता, श्री.एस.पी.खन्ना, उपअभियंता यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

श्री.विकास एडके :यापुर्वी काही अधिकारी यांची विभागीय चौकशी करणेसाठी सभागृहाने मान्यता दिली होती. त्याचे काय झाले?

श्री.अफसर खान :जो विषय चालू आहे. त्यावर बोलणे योग्य होईल.

मा.महापौर :मागचा अहवाल घेता येईल. हा विषय मंजूर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रस्तावात नमुद केलेल्या प्रकरणाच्या बाबतीत श्री.एस.पी.खन्ना, उपअभियंता यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणेच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३१६:-** **(कार्यकारी अभियंता (युआयडी)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शहर विकास योजनेअंतर्गत काल्डा कॉर्नर ते दशमेशनगर शिवमंदीर पर्यंतच्या १५.०० मी.रुंद रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१५-२०१६ च्या दरसुचीनूसार र.रु.१,४९,६०,६८५/- चे तयार करण्यात आलेले आहे. प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ च्या प्रस्तावीत अर्थसंकल्पात विकास योजनेअंतर्गत रस्ते विकसीत करणे या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यात येणार आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान करून मा.सर्वसाधारण सभेत विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करणे बाबत शिफारस करण्यात आलेली आहे.

करीता, प्रस्तावित कामाच्या र.रु.१,४९,६०,६८५/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर विकास योजनेअंतर्गत काल्डा कॉर्नर ते दशमेशनगर शिवमंदीर पर्यंतच्या १५.०० मी.रुंद रस्त्याचे व्हाईट टॉपींग करणेच्या कामाच्या र.रु.१,४९,६०,६८५/- च्या अंदाजपत्रकास तसेच प्रस्तावित कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०१७-१८ च्या प्रस्तावीत अर्थसंकल्पात विकास योजनेअंतर्गत रस्ते विकसीत करणे या लेखाशिर्ष अंतर्गत करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३१७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१०४, बन्सीलाल नगर येथे रमेश भिमसहानी यांचे घर ते हॉटेल माया पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे या नावाने तरतुद उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. परंतु याच प्रभागातील जहागिरदार कॉलनी व इतर विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन वारंवार चोकअप होऊन ड्रेनेजचे घाण पाणी परिसरात वाहत असते. तसेच सदर भागातील चोकअप रॉडिंग व जेटींग मशिनद्वारे सुध्दा निघते यामुळे या भागातील नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला असल्याने उक्त नमुद नुसार प्रस्तावित भागातील ड्रेनेज लाईन दुरूस्तीची र.रु.९,९८,६२०/- चे अंदाजपत्रक प्रस्तावित करण्यात आले आहे.

करीता, नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टिने या भागातील ड्रेनेज लाईन दुरूस्त करणे अत्यंत आवश्यक असल्याने सदर कामाकरीता (स्थळ बदलाचा) लेखाशिर्ष बदलाच्या प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभेत मान्यता प्रदान करून प्रस्तावित काम त्वरीत हाती घेणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१०४, बन्सीलाल नगर येथे रमेश भिमसहानी यांचे घर ते हॉटेल माया पर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी उपलब्ध असलेल्या तरतुदीतून करावयाच्या कामाऐवजी याच प्रभागातील जहागिरदार कॉलनी व इतर विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन दुरूस्तीच्या कामाचे र.रु.९,९८,६२०/- अंदाजपत्रकाच्या स्थळबदलास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३१८:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-१०४ बन्सीलालनगर-बनेवाडी परिसरातील दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी, ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी तसेच विद्युतीकरण व इतर विकास कामे करण्यासाठी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

| अ.क्र. | कामाचे नाव | अपेक्षीत निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्रमांक-१०४ अंतर्गत रेल्वेस्टेशन उड्डाणपुलालगत राजीव गांधीनगर शेजारील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | ५०.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्रमांक-१०४ अंतर्गत जहागीरदार कॉलनी मुख्य गटारी जवळील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | ५०.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्रमांक-१०४ बनेवाडी अंतर्गत दलित वसाहतीतील विविध रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | ५०.०० लक्ष |
| ४. | वॉर्ड क्रमांक-१०४ अंतर्गत बनेवाडी येथे स्लम भागात विविध रस्त्यालगत पथदिवे लावणे. | ५०.०० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्रमांक-१०४ बन्सीलालनगर बनेवाडी अंतर्गत दलित वसाहतीमधील विविध रस्त्यालगत जलवाहिनी टाकणे. | ५०.०० लक्ष |

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-**श्री.सिध्दांत संजय शिरसाट **अनुमोदक:-**श्री.नितीन दशरथ साळवी

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-१०४ बन्सीलालनगर-बनेवाडी परिसरातील दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विविध विकास कामे करण्यासाठी निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नाव | अपेक्षीत निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्रमांक-१०४ अंतर्गत रेल्वेस्टेशन उड्डाणपुलालगत राजीव गांधीनगर शेजारील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | ५०.०० लक्ष |
| २. | वॉर्ड क्रमांक-१०४ अंतर्गत जहागीरदार कॉलनी मुख्य गटारी जवळील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे. | ५०.०० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्रमांक-१०४ बनेवाडी अंतर्गत दलित वसाहतीतील विविध रस्त्याचे | ५०.०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | कॉंक्रीटीकरण करणे. | |
| ४. | वॉर्ड क्रमांक-१०४ अंतर्गत बनेवाडी येथे स्लम भागात विविध रस्त्यालगत पथदिवे लावणे. | ५०.०० लक्ष |
| ५. | वॉर्ड क्रमांक-१०४ बन्सीलालनगर बनेवाडी अंतर्गत दलित वसाहतीमधील विविध रस्त्यालगत जलवाहिनी टाकणे. | ५०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३१९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९४, गजाननगर, भारतनगर या भागामध्ये ५० टक्के दलित लोकसंख्या राहत असून या भागामध्ये बऱ्याच दिवसांपासून विकास कामे झालेली नाहीत. ते खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.९४,गजाननगर, भारतनगर या भागामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.०१ कोटी |
| २. | वॉर्ड क्र.९४,गजाननगर, भारतनगर या भागामध्ये पिण्याची पाईप लाईन टाकणे. | रु.०१ कोटी ५० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.९४,गजाननगर, भारतनगर या भागामध्ये विद्युत पोल व पथदिवे टाकणे. | रु.७५ लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.९४,गजाननगर, भारतनगर या भागामध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.०१ कोटी |

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.आत्माराम माणिकराव पवार **अनुमोदक:-**श्री.रुपचंद लक्ष्मण वाघमारे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९४, गजाननगर, भारतनगर या भागामध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे विविध विकास कामे करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.९४,गजाननगर, भारतनगर या भागामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे. | रु.०१ कोटी |
| २. | वॉर्ड क्र.९४,गजाननगर, भारतनगर या भागामध्ये पिण्याची पाईप लाईन टाकणे. | रु.०१ कोटी ५० लक्ष |
| ३. | वॉर्ड क्र.९४,गजाननगर, भारतनगर या भागामध्ये विद्युत पोल व पथदिवे टाकणे. | रु.७५ लक्ष |
| ४. | वॉर्ड क्र.९४,गजाननगर, भारतनगर या भागामध्ये सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे. | रु.०१ कोटी |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३२०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक-८९, चिकलठाणा परिसरातील बौध्दवाडा, अण्णाभाऊ साठेनगर, मोतीवाला कॉलनी, ऋषिकेशनगर व इतर दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी तसेच ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत र.रु.५०.०० लक्ष उपलब्ध करून देण्यात यावे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे **अनुमोदक:-**श्री.गजानन भानुदास मनगटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रमांक-८९, चिकलठाणा परिसरातील बौध्दवाडा, अण्णाभाऊ साठेनगर, मोतीवाला कॉलनी, ऋषिकेशनगर व इतर दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी तसेच ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत र.रु.५०.०० लक्षचा निधी उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३२१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२६ नेहरूनगर येथील कामाचे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.

**कामाचे नाव :-** वॉर्ड क्र.२६ नेहरूनगर अंतर्गत डिकाशन हॉटेल ते डिपी पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीट करणे. अंदाजपत्रक र.रु.६ लाख ५० हजार.

**ऐवजी :-** नेहरुनगर गल्ली नं.१ शब्बीर पटेल यांच्या गल्लीत कॉंक्रीट करणे.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती शेख नरगीस सलिम **अनुमोदक:-**श्री.खान इरशाद इब्राहिम

मा.महापौर :-विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.२६ नेहरूनगर अंतर्गत डिकाशन हॉटेल ते डिपी पर्यंत रस्त्याचे कॉंक्रीट करणे. अंदाजपत्रक र.रु.६ लाख ५० हजार या कामाऐवजी नेहरुनगर गल्ली नं.१ शब्बीर पटेल यांच्या गल्लीत कॉंक्रीट करण्याच्या कामाच्या लेखाशिर्ष बदलास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३२२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.८३ मुकूंदवाडी, संजयनगर परिसरातील दलित वसाहतीमध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत कॉंक्रीट रस्ते तयार करण्यासाठी ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी तसेच विद्युतीकरण व इतर विकास कामे करण्यासाठी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील प्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात यावा, करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | कामाचे नांव | अपेक्षीत निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी, संजयनगर अंतर्गत लायन्स क्लब कॉलनीतील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५.०० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत लघूवेतनकॉलनी परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५.०० लक्ष. |
| ३. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत शिवाजी कॉलनी परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे. | १५.०० लक्ष. |
| ४. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत पोलिस कॉलनी परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५.०० लक्ष. |

**सुचक:-** श्रीमती कमल रामचंद्र नरोटे **अनुमोदक:-** श्री.रामेश्वर बाबुराव भादवे

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.८३ मुकूंदवाडी, संजयनगर परिसरातील दलित वसाहतींमध्ये दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध विकास कामांकरीता खालील प्रमाणे निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | कामाचे नांव | अपेक्षीत निधी |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी, संजयनगर अंतर्गत लायन्स क्लब कॉलनीतील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५.०० लक्ष. |
| २. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत लघूवेतनकॉलनी परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५.०० लक्ष. |
| ३. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत शिवाजी कॉलनी परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे. | १५.०० लक्ष. |
| ४. | वॉर्ड क्र.८३, मुकूंदवाडी अंतर्गत पोलिस कॉलनी परिसरातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणे. | २५.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३२३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९० राजनगर, मुकूंदनगर मध्ये जिल्हा वार्षीक योजना अनुसूचित उपाययोजना सन २०१७-१८ च्या प्राप्त निधी मधून वॉर्ड क्र.९० राजनगर, मुकूंदनगर येथे ८०% पेक्षा जास्त प्रमाणात दलित लोकसंख्या आहे. त्या भागातील रस्ता तयार करणे व मजबुतीकरण करण्यासाठी रु.१.०० कोटी व ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी रु.१.०० कोटी व पथदिवे बसविणेसाठी रु.२५ लाख मा.सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर करून प्रस्ताव समाजकल्याण अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संबंधीत विभागास पाठविण्यात यावा.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती अनिता मोहन साळवे

**अनुमोदक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप, श्री.खान अय्युब म.हुसेन खान

मा.महापौर :विषय मंजुर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९० राजनगर, मुकूंदनगर येथे जिल्हा वार्षीक योजना अनुसूचित उपाययोजना सन २०१७-१८ च्या प्राप्त निधी मधून दलित वसाहतींमध्ये रस्ता तयार करणे व मजबुतीकरण करण्यासाठी रु.१.०० कोटी व ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी रु.१.०० कोटी व पथदिवे बसविणेसाठी रु.२५ लाख इतका निधी प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव समाजकल्याण अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३२४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८२ अंबिकानगर मध्ये जिल्हा वार्षीक योजना अनुसूचित उपाययोजना सन २०१७-१८ च्या प्राप्त निधी मधून वॉर्ड क्र.८२ मधील संतोषीमाता नगर व अंबिकानगर येथे ७०% पेक्षा जास्त प्रमाणात दलित लोकसंख्या आहे. त्या भागातील सिमेंट रस्ता करण्यासाठी रु.१.०० कोटी व ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी रु.१.०० कोटी मा.सर्वसाधारण सभेमध्ये मंजुर करून प्रस्ताव समाज कल्याण अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संबंधीत विभागास पाठविण्यात यावा. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.भाऊसाहेब उत्तमराव जगताप,
**अनुमोदक:-** श्रीमती अनिता मोहन साळवे, श्री.खान अय्युब म.हुसेन खान
मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.८२ अंबिकानगर मधील संतोषीमाता नगर व अंबिकानगर या दलित वसाहतींमध्ये जिल्हा वार्षीक योजना अनुसूचित उपाय योजना सन २०१७-१८ च्या प्राप्त निधी मधून सिमेंट रस्ता करण्यासाठी रु.१.०० कोटी व ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी रु.१.०० कोटी ची कामे करण्याकरीता प्रस्ताव समाज कल्याण अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संबंधीत विभागास पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३२५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील खालील कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारे दुसरे विकास कामे करणे बाबत लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामांचे नाव | करावयाचे कामांचे नाव |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.०६ यादवनगर अंतर्गत उत्कर्ष हौ.सो.येथे उद्यान तयार करणे, एससीआर गार्डन पान क्र.७७ अनुक्रमांक १० वर रक्कम रुपये १०.०० लक्ष | वॉर्ड क्र.०६ यादवनगर परिसरात ओला व सुका कचरा वर्गीकरण करणे करीता डस्ट बीन खरेदी करणे रुपये १०.०० लक्ष |

**सुचक:-** श्रीमती पुष्पा उत्तमराव रोजतकर **अनुमोदक:-** श्री.गजानन भानुदास मनगटे
मा.महापौर : विषय मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पातील खालील काम रद्द करून प्रभागात आवश्यक असणारे दुसरे विकास काम करणे बाबतचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | रद्द करावयाचे कामांचे नाव | करावयाचे कामांचे नाव |
|---|---|---|
| ०१ | वॉर्ड क्र.०६ यादवनगर अंतर्गत उत्कर्ष हौ.सो.येथे उद्यान तयार करणे, एससीआर गार्डन पान क्र.७७ अनुक्रमांक १० वर रक्कम रुपये १०.०० लक्ष | वॉर्ड क्र.०६ यादवनगर परिसरात ओला व सुका कचरा वर्गीकरण करणे करीता डस्ट बीन खरेदी करणे रुपये १०.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३२६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.१४ अंतर्गत गरीब व हातावर काम करणारे कष्टकरी नागरीक मोठ्या प्रमाणात राहतात. या नागरीकांना मुलभूत सोई-सुविधा मागील बऱ्याच वर्षापासून मिळालेल्या नाहीत. या नागरीकांसाठी मुलभूत सोई-सुविधा ड्रेनेज लाईन टाकणे, पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे, विद्युत व्यवस्था करणे, रस्त्याचे काम करणे इत्यादीसाठी रक्कम रुपये ०५.०० कोटी रक्कम आवश्यक आहे.

करीता, या वॉर्डांतर्गत खालील मुलभूत सोई-सुविधांची कामे करणेसाठी दलित वस्ती सुधार योजना निधीमधून रक्कम रुपये ५.०० कोटी निधी उपलब्ध करून देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

१. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे.

२. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत पिण्याचे पाण्याची लाईन टाकणे.
३. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विद्युत व्यवस्था करणे.
४. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे.

**सुचक:-**श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ `**अनुमोदक:-**श्रीमती मनिषा विनोद लोखंडे

मा.महापौर : विषय मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.१४ येथे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत खालील विविध विकास कामे करण्यासाठी रुपये ५.०० कोटी निधी उपलब्ध होण्यास मंजुरी देण्यात येते.

१. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत ड्रेनेज लाईन टाकणे.
२. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत पिण्याचे पाण्याची लाईन टाकणे.
३. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत विद्युत व्यवस्था करणे.
४. वॉर्ड क्र.१४, पडेगाव अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्ते तयार करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळीचे विषय

**विषय क्रमांक १३२७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१३/मुमस-३१/प्र.क्र.८८/नवि-२० मंत्रालय, मुंबई दिनांक ०४ ऑक्टोबर २०१३ च्या परिपत्रकानुसार सन १९९५ च्या अपंग पुनर्वसन कायद्यानुसार अपंगाच्या कल्याणार्थ काही तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेला बजेट पैकी काही निधी हा अपंगाच्या कल्याणार्थ खर्च करावयाचा आहे. तथापी महानगरपालिकांकडे अपंगांची माहिती व नोंद उपलब्ध नसल्याने हा निधी योग्य तऱ्हेने खर्च करण्यास अडचणी येतात.

सदर परिपत्रकात नमुद केल्यानुसार ज्याप्रमाणे महानगरपालिका स्तरावर जन्म, मृत्यू नोंदणी करणे सक्तीचे आहे, त्याच धर्तीवर अपंगांची नोंदणी महानगरपालिका स्तरावर शासनाने उपलब्ध करून दिलेल्या विहित नमुन्यातील नोंदवहीत (रजिष्टर) ठेवणे, विहित नमुन्यात माहिती एकत्रित करणे व शासनास अहवाल सादर करणे इत्यादीबाबत तत्काळ कार्यवाही सुरू करणे गरजेचे आहे.

शासनाच्या परिपत्रकानुसार अपंगत्व प्रमाणपत्र सादर करणाऱ्या अपंगांची नोंदणी महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी असल्यास व त्याबाबतच्या ठोस शासकीय पुरावा सादर केल्यास शासनाने उपलब्ध करून दिलेल्या नमुन्यातील अपंग नोंदणी नोंदवही मध्ये घेण्यासाठी जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणेच सर्व प्रभाग अधिकारी प्रभाग क्रमांक ०१ ते ०९ यांच्या स्तरावर नोंदी घेणे बाबत व पाबंद करणेबाबत प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

मा.महापौर :ऐनवेळीचे विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०१३/मुमस-३१/प्र.क्र.८८/ नवि-२० मंत्रालय, मुंबई दिनांक ०४ ऑक्टोबर २०१३ च्या परिपत्रकानुसार सन १९९५ च्या अपंग पुनर्वसन कायद्यानुसार महानगरपालिका स्तरावर जन्म, मृत्यू नोंदणी करणे सक्तीचे आहे, त्याच धर्तीवर अपंगांची नोंदणी महानगरपालिका स्तरावर शासनाने उपलब्ध करून दिलेल्या विहित नमुन्यातील नोंदवहीत (रजिष्टर) ठेवणे, विहित नमुन्यात माहिती एकत्रित करणे व शासनास अहवाल सादर करणेस्तव अपंगत्व प्रमाणपत्र सादर करणाऱ्या अपंगांची नोंदणी महानगरपालिका क्षेत्रातील रहिवासी असल्यास व त्याबाबतच्या ठोस शासकीय पुरावा सादर केल्यास शासनाने उपलब्ध करून दिलेल्या

नमुन्यातील अपंग नोंदणी नोंदवही मध्ये घेण्यासाठी जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणेच सर्व प्रभाग अधिकारी (प्रभाग क्रमांक ०१ ते ०९) यांना पाबंद करण्यात येत असून त्यांच्या स्तरावर विहीत नमुन्यात नोंदी घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३२८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, अध्यक्ष, छत्रपती लॉन टेनिस कोर्ट यांना मा.स्थायी समिती ठराव क्र.११, दि.१५.०६.२०१७ अन्वये ज्योतीनगर, जयनगर येथील महानगरपालिका टेनिस हॉल लगतच्या खुल्या जागेवर टेनिस कोर्ट उभारणेसाठी क्षेत्रफळ १०००० चौ.फुट (९२९.३६ चौ.मी.) जागा देणेसाठी प्रती माह नाममात्र भाडे रू.१०००/- प्रमाणे आकारणी करून सदर टेनिस कोर्टची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक, सेवा कर इत्यादी सर्व बाबी संबंधीत संस्थेने स्वखर्चाने करावे व महानगरपालिकेस वार्षिक भाडे व इतर कर भरणा करणेसह मा.स्थायी समिती ठराव क्र.११, दि.१५.०६.२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.

परंतु सदरील ठिकाणी संस्था स्वखर्चाने टेनिस कोर्ट बनविणार असून त्यांनी ३० वर्षासाठीच्या मुदतीची मागणी केली आहे. करिता महानगरपालिकेस वार्षिक भाडे व इतर कर भरणा करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

| | |
|---|---|
| श्रीमती समीना शेख | :ऐनवेळीमध्ये जे ही विषय असतील ते वाचून दाखववावे. |
| श्री.गंगाधर ढगे | :१० हजार चौ.फुट जागा फक्त १००० रू दरमहा भाडेने कशी देऊ शकतो. १०X१० ची खोली घेतल्यास ३-४ हजार भाडे लागते. आणि असा प्रशासकीय प्रस्ताव कसा देऊ शकतात. हा ठराव रद्द करावा. |
| श्री गजानन मनगटे | :ही जागा खेळाडूंना खेळण्यासाठी जागा देत आहोत. इतर वापरासाठी देत नाही. मंजूर करावे |
| श्री.रेणुकादास वैद्य | :मुलांना खेळण्यासाठी जागा देत आहोत. त्याचा पुर्ण विकास संबंधीत संस्था करणार आहे. तेथे कमर्शियल वापर होणार नाही. विषय मंजूर करावा. |
| श्री.राजू शिंदे | :लिज पिरीयेड कमी करावा व रेडीरेकनर प्रमाणे भाडे घ्यावे. |
| श्री.प्रमोद राठोड | :असे करता येते का? कोणता जी आर आहे? ३० वर्षासाठी कसे ठरविले प्रशासकीय प्रस्ताव कसा आला? |
| श्री.गजानन बारवाल | :लिज वर द्यायचे की नाही यासाठी प्रस्ताव आलेला आहे. तो प्रस्ताव ऑलरेडी मंजूर आहे. |
| श्री.अफसर खान | :राकाज्ला अशा पध्दतीने जागा दिली होती तेथे व्यावसायिक वापर होत होता. तेथे फिस आकारून पैसे कमावितात. यामध्येही टेनिस खेळण्यासाठी मोफत प्रवेश देणार नाही. |
| श्रीमती समीना शेख | :लिजवर अनेक जागा दिल्या. त्याचे भाडे येत नाही. करारनामा केला नाही. |
| श्री.प्रमोद राठोड | :३० वर्षासाठी कसे देऊ शकतो. प्रशासनाला असे का वाटले. प्रशासनाला असे का वाटले की, ३० वर्षाकरीता द्यावे. |
| मा.महापौर | :या प्रस्तावाची फेर तपासणी करून पुढील सभेत आणावा. |

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार या प्रस्तावाची फेर तपासणी करून पुढील सभेत हा प्रस्ताव ठेवावा.

**विषय क्रमांक १३२९:-**

आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना कर्तव्यात कसूर केल्याबाबत दि.२१/४/२०११ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते. विभागीय चौकशीअंती त्या दोषी आढळून आल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ५ (नऊ) प्रमाणे शिक्षा करण्यास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.९६४ दि.१८/१०/२०१२ अन्वये मंजूरी देण्यात आली होती. त्यानुसार दि.९/११/२०१२ रोजीच्या आदेशान्वये त्यांना महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले होते.

तथापि, सदरच्या शिक्षेविरूध्द संबंधितांनी शासनाकडे केलेल्या अपिलाचे अनुषंगाने तत्कालीन मा.प्रधान सचिव (नवि-२), मंत्रालय, मुंबई यांनी केलेल्या चौकशीमध्ये त्यांचेवरील दोषारोप सिध्द झाले नाहीत. तसेच तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी शासनाकडे दिनांक ०६/०१/२०१४ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार संबंधितावर ठेवण्यात आलेले आरोप निर्विवादपणे सिध्द होत नसल्याचे निष्कर्ष काढले होते. सदर दोन्ही अधिकारी हे भा.प्र.से.संवर्गातील अधिकारी असून चौकशी अधिकारी यांच्या दर्जापेक्षा वरिष्ठ दर्जाचे अधिकारी आहेत. उक्त दोन्ही अधिकाऱ्यांच्या निष्कर्षाशी मी सहमत असून त्यामुळे चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षाशी असहमती दर्शविण्यात येते. तद्नुषंगाने शासनाने दि.०६/०१/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ठराव क्र.९६४ दि.१८/१०/२०१२ अंतिमतः विखंडीत केला. सदर शासन निर्णयानुसार त्यांना दिनांक ०८/०१/२०१६ पासून रूजू करून घेण्यात आले आहे.

वरील बाबी पाहता, श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना विभागीय चौकशीच्या प्रक्रियेतून दोषमुक्त करणे क्रमप्राप्त आहे. तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रू.९३००-३४८०० ग्रेड पे रू.४,४००/-)या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधितांची वेतनश्रेणी रू.९३००-३४८०० ग्रेड-पे रू.४,६००/- अशी आहे.

करीता श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना सदरच्या विभागीय चौकशीच्या प्रक्रियेतून दोषमुक्त करणेस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| | |
|---|---|
| श्री.प्रमोद राठोड | :तातडीचा प्रस्ताव नाही. घाई नको. सविस्तर माहिती समोर यावी. |
| मा.आयुक्त | :माहिती प्रशासनाकडून आता सुध्दा माहिती मिळू शकेल. |
| श्री.नंदकुमार घोडेले | :दोषारोप सिध्द झाले नाही. चौकशी झाली. मंजूर करण्यास हरकत नसावी. |
| श्री.विकास एडके | :मंजूर करण्यास हरकत नसावी. |
| श्रीमती समीना शेख | :स्थगिती द्यावी. |
| श्री.राजू शिंदे | :मंजूर करावे. तसेच ऐनवेळचे सर्व विषय मंजूर करावे. |
| **मा.महापौर** | **:ऐनवेळचे सर्व विषय मंजूर. तसेच कार्यक्रम पत्रिका क्रमांक ४२ ते ४८ पर्यंत व दिनांक १६ ऑक्टोबर २०१७ पर्यंतचे इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.** |

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना विभागीय चौकशीअंती दोषी आढळून आल्याने मा.सर्वसाधारण ठराव क्र.९६४ दि.१८/१०/२०१२ अन्वयेच्या मंजुरीनुसार महानगरपालिकेच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले असता, सदरच्या शिक्षेविरूध्द संबंधितानी शासनाकडे अपिल दाखल केले. तत्कालीन मा.प्रधान सचिव (नवि-२), मंत्रालय, मुंबई यांनी केलेल्या चौकशीमध्ये त्यांचेवरील दोषारोप सिध्द न झाल्याने तसेच तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी शासनाकडे दि.०६/०१/२०१४ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार संबंधितावर ठेवण्यात

आलेले आरोप निर्विवादपणे सिध्द होत नसल्याचे निष्कर्षानुसार शासनाने दि.०६/०१/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये ठराव क्र.९६४ दि.१८/१०/२०१२ अंतिमत: विखंडीत केला. उपरोक्त शासन निर्णयाशी विद्यमान मा.आयुक्तांनी सहमती दर्शविलेली असून मनपाच्या चौकशी अधिकाऱ्याच्या निष्कर्षाशी असहमती दर्शविलेली असल्यामुळे श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना विभागीय चौकशीच्या प्रक्रियेतून दोषमुक्त करणे क्रमप्राप्त असल्याचे प्रस्तावात नमुद केलेले आहे. करीता उक्त बाबी पाहता श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना सदरच्या विभागीय चौकशीच्या प्रक्रियेतून दोषमुक्त करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३३०:-**

प्रस्ताव ठेवण्यात येतो की, औरंगाबाद मनपाच्या सर्व स.नगरसेवकांना आपल्या स्वेच्छा निधीतून वार्षिक २.०० लाख रू.गरजू रूग्णांना उपचारा करीता खर्च करण्यासाठी मंजुरी देण्यात यावी. प्रत्येक रूग्णाला रू.१०,०००/- पर्यंत मदत म्हणून देण्याची सर्वसाधारण सभेने एकमताने मंजुरी देण्यात यावी. जेणे करून गरजू रूग्णांना याचा फायदा होईल व त्यांच्या उपचारात आपले योगदान होईल.

**सुचक**:-श्री.अब्दुल रहीम शेख नाईकवाडी **अनुमोदक**:-श्री.सिद्दीकी नासेर तकिउद्दीन

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद मनपाच्या सर्व स.नगरसेवकांना स्वेच्छा निधीतून प्रत्येक रूग्णाला १० हजार प्रमाणे वार्षिक २.०० लाख रू. गरजू रूग्णांना उपचारा करीता खर्च करण्यासाठी मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव आहे. स्वेच्छा निधीच्या संदर्भातील शासन निर्णय, मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३३१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.यमाजी रिठे, श्री.शांतीलाल रिठे, श्री.हिरामण रिठे आणि त्यांचे नोंदणीकृत आममुखत्यार व विकासक सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी. तर्फे श्री.नितीन वेणुप्रसाद बगडीया यांनी त्यांच्या दिनांक २५/३/२०१७ आणि दिनांक १२/९/२०१७ च्या विनंती अर्जाद्वारे गट क्र.७०८, मौ.चिकलठाणा येथील त्यांच्या जागेतून जाणाऱ्या महानगरपालिकेच्या २४ व १२ मीटर रूंद विकास योजना रस्त्याचा विकास स्वखर्चाने करणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

गट क्र.७०८, मौ.चिकलठाणा येथील अर्जदारांच्या जागेतून महानगरपालिका मंजुर विकास योजनेमध्ये खालील २४ व १२ मी.रूंद विकास रस्ते प्रस्तावित आहेत. उक्त विकास योजना रस्ते प्रस्तावित विकास योजनेमध्ये देखील कायम आहेत.

| अ.क्र. | विवरण | लांबी (मी.) | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १ | २४ मी. रूंद विकास रस्ता (उत्तर-दक्षिण) | ३००.०० | ७१९८.६४ |
| २ | १२ मी. रूंद विकास रस्ता (पुर्व-पश्चिम) | ३०१.१७ | ३६४४.५४ |
| ३ | १२ मी. रूंद विकास रस्ता (उत्तर-दक्षिण) | ११५.५७ | १३८६.८६ |
| **एकुण** | | **७१६.७४** | **१२२३०.०४** |

संबंधीत मिळकत मालक आणि विकासकाने प्रस्तावित केल्यानुसार वरील रस्त्यांपैकी २४ मीटर रूंदीचा रस्ता हा जालना रस्त्यावरून विमानतळासमोरून उत्तरेकडे जात आहे. विकासकाच्या जागेच्या पुढे बरीच जागा ही रहिवाशी क्षेत्र म्हणुन विकास योजनेमध्ये (प्रस्तावित योजनेतही) दाखविलेली आहे. सद्य:स्थितीमध्ये या जागेचा विकास झालेला नाही. विकासक देखील त्यांच्या जागेचा भविष्यात विकास करणार आहेत. तसेच या विकास योजना रस्त्यावरून लगतच्या इतर भागाचाही भविष्यात सदर पोच रस्ता म्हणुन उपलब्ध होणार असल्याने विकास होऊ शकेल.

संबंधीत मिळकत मालक आणि विकासकाने दिलेल्या प्रस्तावानुसार त्यांच्या जागेमधून जाणारे २४ व १२ मीटर रूंद रस्ते स्वयंविकास पध्दतीने (Self Development) परिपुर्णरित्या महानगरपालिकेच्या मंजुर स्पेसिफिकेशननुसार विकसीत करून देणार असून, त्यानुसार विकासक २४ व १२ मीटर रूंदीच्या विकास (D.P.Roads) रस्त्यांचे एकूण क्षेत्र १२२३०.०४ चौ.मी. विकासक महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यास तयार आहेत. तसेच (१) या रस्त्यांच्या जागेचा मोबदला विकासकास रोख रक्कमेच्या स्वरूपात न देता विकास नियंत्रण नियमावली नुसार देय चटई क्षेत्र निदेर्शांक (FSI) किंवा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) स्वरूपात घेणार असून, हे चटई क्षेत्र विकासक त्यांच्या उर्वरीत जागेच्या विकासाच्या वेळी वापरात घेतील. (२) २४ मी. व १२ मी. रूंद रस्त्यांच्या बांधकामासाठी लागणारा सर्व खर्च विकासक करणार असून, हा खर्च विकासक त्यांच्या उर्वरीत जागेच्या रेखांकन व बांधकाम परवानगी प्रस्तावाच्या वेळेस येणाऱ्या/लागणाऱ्या जमीन विकास शुल्क (LDC) व शहर विकास निधीच्या (CDC) चलनाच्या रकमेमध्ये वळती/हिशोबीत करावा अशी अर्जदारांची मागणी आहे.

चिकलठाणा औद्योगिक वसाहत शहराचा एक महत्वाचा विकासनशील भाग असून, वाढत्या औद्योगिकरणामुळे या भागात अनेक नागरी वसाहती, शॉपींग माल, हॉटेल्स इत्यादी झपाट्याने विकसीत होत आहेत. महानगरपालिकेला विकास योजना रस्त्यांचा विकास करण्यासाठी आर्थिक तरतुदी अभावी तसेच आर्थिक अडचणींमुळे अधिक कालावधी लागतो. तसेच मोठी आर्थिक गुंतवणुकही करावी लागते. औरंगाबाद महानगरपालिका विकास प्राधिकरण असल्याने वीज, पाणी, ड्रेनेज इत्यादी अत्यावश्यक सुविधेला प्रथम प्राधान्य द्यावे लागते. त्यामुळे आर्थिक तरतुदी अभावी महानगरपलिकेकडून मोठ्या विकास योजना रस्त्यांची कामे करण्यास मर्यादा येते व त्यामुळे रस्ते विकासासाठी विलंब होतो. सद्यःस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुदृढ नाही. सदर प्रस्ताव मान्य केल्यास या भागाचा विकास लवकर होण्यास मदत होईल आणि या विकसीत झालेल्या मालमत्तांद्वारे महानगरपालिकेला देखील मोठ्या प्रमाणात मालमत्ता कराद्वारे दरवर्षी नेमाने उत्पन्न मिळण्यास सुरूवात होईल.

विकासकाने दिलेल्या प्रस्तावानुसार सदर विकास रस्ते (DP Roads) राष्ट्रीय मानकानुसार (IRC Standard) विकसीत करावयाचे असून, विकास योजना रस्ता विकसीत करणे, रस्त्यांच्या दोन्ही बाजूला पादचारी फुटपाथ बांधणे, रस्त्याच्या मध्यभागी रस्ता दुभाजक बांधणे, दुभाजकात पथदिवे उभारणे, आवश्यक ठिकाणी वाहतुक नियंत्रक उभारणे, आवश्यकतेनुसार विद्युत पोल उभारणे, आवश्यकतेनुसार विद्युत खांब रस्त्याच्या भागात येत असल्यास ते हटवून घेणे तसेच आवश्यक त्या संख्येने वृक्षारोपण करणे व त्याची निगा राखणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

सदरील विकास योजना रस्ते विकसीत करण्यासाठी आपसातील सामंजस्य करार तत्वावर (MOU) करण्यात येणार असून या प्रकल्पाचा सर्व विकास कामांचा खर्च विकासक प्रथम करणार आहे. सदरचा प्रकल्प स्वयंविकास (Self Development) धर्तीवरील असून, यामध्ये या रस्ता विकासाच्या कामावर विकासकास येणारा त्यांच्या प्रस्तावानुसारचा संपूर्ण खर्च जमीन विकास शुल्क (LDC)/शहर विकास निधी (CDC) आणि देय चटई क्षेत्र निदेर्शांक (FSI) किंवा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) करीता लागणारे शुल्क, विकास खर्च (Betterment Charges) स्वरूपात तसेच प्रकल्पाचा इतर अनुषंगीक खर्च समायोजित करण्यात येईल.

विकासकाने सादर केलेल्या प्रस्तावास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. या प्रकल्पासाठीचा करार हा श्री.यमाजी रिठे, श्री.शांतीलाल रिठे, श्री.हिरामण रिठे आणि त्यांचे नोंदणीकृत आममुखत्यार व विकासक सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी. तर्फे श्री.नितीन वेणुप्रसाद

बगडीया, औरंगाबाद या नांवाने करण्यात येणार असून, या प्रकल्पाशी संबंधीत पत्रव्यवहार, करारनामा व कार्यालयीन सर्व औपचारीकता श्री.नितीन वेणुप्रसाद बगडीया यांचेसोबत पूर्ण करण्यात येईल.

२. सदर रस्ता प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विकासकास प्रत्यक्षात जेवढा खर्च येईल तेवढी रक्कम जमीन विकास शुल्क, शहर विकास निधी आणि चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) किंवा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) करिता लागणारे शुल्क, विकास खर्च स्वरूपात समायोजित करण्यात येईल.

३. विद्यमान मंजूर विकास योजनेतील गट क्र.७०८, चिकलठाणा येथे विकास आराखड्यात दर्शविलेले खेळाचे मैदान ज्याचे क्षेत्रफळ ६६६८.२६ चौ.मीटर आहे. सदर मैदान विकसीत करून, विकसीत झालेले मैदान आणि मैदानाची जमीन संबंधीत मिळकत मालक आणि विकासक महानगरपालिकेस हस्तांतरीत करणार असल्याने त्याचा मोबदला म्हणून महानगरपालिका देय असलेल्या क्षेत्राचा Amenity Transfer of Development Rights (Amenity TDR) संबंधीत विकासकास देईल.तथापी प्रस्तावीत विकास याजना नकाशामध्ये उक्त आरक्षण नाही प्रस्तावीत विकास योजनेबाबत अंतीम निर्णय झाल्यानंतर लागू होणा-या विकास योजनेच्या तत्कालीन स्थितीनुसार या बाबत निर्णय घेण्यात येईल.

४. सदरचा प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर विकासकास पहिली पाच वर्षे या रस्त्याची सर्व देखभाल दुरूस्ती विकासकास Defect Liability Period म्हणून विनामुल्य त्यांचे खर्चाने करावी लागेल.

५. सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.तर्फे श्री.नितीन वेणुप्रसाद बगडीया यांच्यातर्फे विकसीत होणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पाची नगर रचना विभागातून जेव्हा बांधकाम परवानगी किंवा भोगवटा प्रमाणपत्र इत्यादी घेण्यात येईल त्यावेळी त्यांना आकारण्यात येणारे शुल्क उदा. शहर विकास निधी (CDC), जमीन विकास शुल्क (LDC),संभाव्य दंड व प्रिमीयम, अनामत रक्कम, बांधकाम परवानगी तपासणी शुल्क, बेटरमेंट चार्जेस (विकास खर्च) इत्यादी रकमेचे समायोजन आणि चटई क्षेत्र, निर्देशांक (FSI) किंवा हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) स्वरूपात देतेवेळी लागणाऱ्या शुल्काचे समायोजन करण्यात येईल. सदर समायोजन रस्त्याच्या प्रकल्पाचे काम महापालिकेने दिलेल्या स्पेसिफिकेशन नुसार करण्यासाठी रस्त्याची अंदाजपत्रके तयार केल्यानंतर व सदर अंदाजपत्रकांना आयुक्त यांची प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर त्या आधारे करण्यात येईल. अंतिम केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेतून रस्त्याची कामे प्रत्यक्षात पुर्ण झाल्यानंतर झालेला खर्च जर नगररचना विभागाने केलेल्या समायोजित रक्कमेपेक्षा कमी असल्यास समायोजनाच्या फरकाची रक्कम प्रकल्पाचे भोगवटा प्रमाणपत्र घेण्यापुर्वी विकासकास महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल.

६. विकासक तसेच मुळ जमीन मालक (१) श्री.यमाजी रिठे (२) श्री.शांतीलाल रिठे आणि (३) श्री.हिरामण रिठे यांना २४ मीटर आणि १२ मीटर रूंद विकास योजना रस्त्याखालील जागा आणि सर्व उपांगासह विकसीत होणारा रस्ता नोंदणीकृत दस्ताद्वारे महानगरपालिकेच्या मालकी हक्कात हस्तांतरीत करून द्यावा लागेल. म्हणजेच या हस्तांतरणानंतर या रस्त्यावर महानगरपालिकेची निर्विवाद मालकी प्रस्थापित होईल. त्या क्षेत्राकरीता सक्षम कार्यालयात मालकी हक्कात महानगरपालिकेचे नाव लावण्याची जबाबदारी विकासकाची राहील. तसेच भविष्यात या रस्त्यास इतर सार्वजनिक रस्ते जोडावयाचे झाल्यास तसे रस्ते महानगरपालिकेच्या पुर्व परवानगीने जोडण्याची परवानगी देण्यात येईल. परवानगीची ही बाब संपूर्णतः महानगरपालिकेच्या मंजुरीच्या अधीन असेल. उक्त रस्ते सार्वजनिक रस्ते म्हणुन घोषित होतील.

७. रस्ता प्रकल्पाचे काम विकासक करीत असतांना किंवा काम पुर्ण होईपर्यंतच्या कालावधीत रस्ता प्रकल्पातील गृहीत बाबी व्यतिरिक्त काही अतिरिक्त बाबी कामादरम्यान समोर आल्यास व त्या

अतिरिक्त बाबींची कामे करणे विकासकास बंधकारक राहील. त्यावरील खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ट करण्यात येईल तसेच ज्या बाबींची कामे होणार नाहीत त्यांचा खर्च प्रकल्प खर्चातून वजा करण्यात येईल. याबाबत महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी आवश्यक असेल. तसेच या प्रकल्पाच्या वाढीव बाबींवर होणारा खर्च शहर अभियंता यांच्याकडून तांत्रिकदृष्टया प्रमाणित करून घेऊन त्यास महापालिका आयुक्तांची मंजुरी घेणे बंधनकारक राहील.

८. रस्ता बांधकामाचा प्रकल्प पुर्ण झाल्यानंतरची आणि रस्ता प्रकल्पाचे काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र शहर अभियंता यांनी निर्गमित केल्याच्या तारखेपासून पहिली पाच वर्षे या २४ मीटर आणि १२ मीटर रूंद विकास रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण होणार नाही व हा रस्ता नेहमी अतिक्रमण मुक्त राहील याची व सदर रस्ता सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ही विकासकाची राहील.

९. विकासक या रस्त्यावरील पथदिव्यांची उभारणी आणि पथदिव्यांचे सनियंत्रण करील, मात्र रस्त्यावरील पथदिव्यांचे वीज बील महानगरपालिका अदा करील. विकासकातर्फे या रस्त्यावर उभारण्यात येणाऱ्या वाहतुक नियंत्रकांचा/पथदिव्यांच्या उभारणीचा खर्च प्रकल्प खर्चात समाविष्ट करण्यात येईल. या पथदिव्यांची व वाहतुक नियंत्रकांची उभारणी केल्यापासून/काम पूर्णत्वाचे दिनांकापासून विकासकास पहिली पाच वर्षे देखभाल दुरूस्ती विना मोबदला करावी लागेल.

१०. चालू दरसूचीनुसार (२०१६-१७) या रस्ता प्रकल्पाची जी काही किंमत येईल त्या रक्कमेस महापालिका आयुक्तांची मंजुरी घेऊन त्यानुसार विकासक रस्ते विकसीत करण्याचे काम महापालिका आयुक्तांच्या पुर्व मंजुरीने हाती घेईल. तत्पुर्वी विकासक आणि महापालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त रितसर करारनामा करतील.

११. या २४ मी. आणि १२ मी. रूंद विकास रस्त्यावर सद्य:स्थितीत असलेली सर्व प्रकारची कच्ची/पक्की अतिक्रमणे हटविण्याची जबाबदारी विकासकाची असेल.

१२. विकासकास प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर व देखभाल दुरूस्तीचा पाच वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर प्रकल्पाची सर्व उपांगे, रस्त्याखालील जागा इत्यांदीचे (संपूर्ण विकसीत प्रकल्प) अतिक्रमण विरहीत स्थितीत महानगरपालिकेकडे सुस्थितीत हस्तांतरण करावे लागेल. त्यावेळी महानगरपालिकेच्या संबंधीत तांत्रिक विभागाचे सुस्थितीबाबत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

१३. विकासकास या रस्ता प्रकल्पात समाविष्ट सर्व प्रकारची कामे महानगरपालिकेने दिलेल्या स्पेसिफिकेशन नुसार पुर्ण करावी लागेल. यासाठी महानगरपालिका निर्देशित करेल त्यानुसार रस्ता कामासाठी वापरण्यात येणाऱ्या बांधकाम साहित्य आणि अनुषंगीक सर्व आवश्यक बाबींच्या चाचण्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेतून विकासकाला स्वखर्चाने करून देणे बंधनकारक राहील.

१४. विकासकास या प्रकल्पाची सर्व कामे महानगरपालिका औरंगाबादच्या मार्गदर्शनाखाली व निगरानीखाली पुर्ण करावी लागतील व त्यासाठी महानगरपालिका जेवढ्या निगरानी शुल्काची आकारणी करेल तेवढे निगरानी शुल्क (Supervision Charges) देखील वळते/हिशोबीत करून घेण्यात यावे.

१५. रस्ता प्रकल्पाचा संपुर्ण प्रगती अहवाल वेळोवेळी म्हणजेच रस्ता प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर तसेच देखभाल दुरूस्तीचा पहिल्या पाच वर्षाचा कालावधी पुर्ण होईपर्यंत नियमीतपणे किमान सहा महिन्यातून एकदा लेखी स्वरूपात विकासकाने महानगरपालिकेस देणे आवश्यक राहील.

१६. विकासकास केलेल्या कामाची नोंद घेणे, कामाची परिमाणे नोंदविणे, काम योग्य मानकानुसार होण्यासाठी तसेच दक्षता व गुणनियंत्रणासाठी कामावर स्वतंत्र तांत्रिक प्रकल्प सल्लागार (Project Management Consultant) नेमावा लागेल. प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करतांना त्याची

पात्रता व अनुभव तपासून त्यास शहर अभियंता यांचेकडून मान्यता प्राप्त करून घ्यावी लागेल. प्रकल्प सल्लागार यांच्या मानधनाची रक्कम व तद्नुषंगीक यासाठी येणारा खर्च विकासकाने करावा. हा खर्च रस्ता प्रकल्पाच्या खर्चात समायोजित करण्यात येणार नाही.

१७. या कामासाठी योग्य अशा पात्र आणि अनुभवी कंत्राटदाराची नेमणूक विकासकाने करावी, जेणेकरून प्रकल्पाचा विकास सुयोग्य पध्दतीने होईल. कंत्राटदाराची पात्रता व अनुभव तपासून त्यास शहर अभियंता यांचेकडून प्रथम मान्यता प्राप्त घ्यावी लागेल.

१८. प्रकल्पाच्या कामाचे मोजमाप महापालिकेच्या मोजमाप पुस्तिकेत नोंदविल्या जाईल प्रकल्प सल्लागार आणि महापालिकेच्या शहर अभियंता यांनी खर्चास तसेच मोजमापास प्रमाणित केल्याशिवाय तो प्रकल्पाचा खर्च ग्राह्य धरता येणार नाही.

१९. विकासकास सदरच्या रस्त्याचे काम सुरू करण्यापुर्वी प्रत्यक्ष जागेवर सक्षम कार्यालयाकडून (TILR) रस्त्याची आखणी करून घेणे बंधनकारक राहील.

२०. रस्त्याची आखणी करण्यासाठी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद शहर, औरंगाबाद यांचेकडून रस्त्याच्या आखणीसाठी शुल्क भरणेसाठी अथवा या अनुषंगाने येणारा संपूर्ण खर्च विकासक करील. हा खर्च समायोजित करण्यात येण्यात येणार नाही.

२१. रस्त्याच्या क्षेत्राचे मालकी हक्क इजमेंट राईटस् इत्यादी बाबत भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्यास विकासक जबाबदार राहील. त्यावेळी होणाऱ्या संभाव्य नुकसानीकरीता महानगरपालिका जबाबदार राहणार नाहीत.

२२. उक्त विकास कामे मंजुर व प्रस्तावित विकास योजनेमधील विद्यमान स्थिती विचारात घेऊन करण्यात येत आहे. दरम्यान प्रस्तावित विकास योजनेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल प्रकरणाचे निकालास अधिन राहून सदर प्रकरणी मान्यतेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

२३. भविष्यात कोणत्याही कारणाने प्रकल्प रद्द झाल्यास किंवा स्थगीत झाल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही. तसेच विकासकास कोणतीही नुकसान भरपाई महानगरपालिका देणार नाही. तसेच रस्ता कामे अर्धवट राहील्यास त्या कामाच्या खर्चाचे समायोजन अथवा वजावट प्रस्तावित केल्यानूसार महानगरपालिकेकडून करण्यात येणार नाही.

२४. रस्ता प्रकल्पाचे काम विकासकास रस्ता प्रकल्पाची परवानगी मिळाल्यापासून बारा (१२) महिन्याच्या आत पुर्ण करावे लागेल. रस्ता प्रकल्पाचे काम बारा (१२) महिन्यात विकासकाने पुर्ण केले नाही तर विकासकास महानगरपालिकेतर्फे दिलेली बांधकाम परवानगी/रेखांकन परवानगी रद्द करण्यात येईल. बांधकाम परवानगी/रेखांकन परवानगी रद्द केल्यामूळे होणाऱ्या आर्थिक व इतर कोणत्याही नुकसानीस तसेच इतर सर्व परिणामाबाबत महापालिका जबाबदार राहणार नाही. त्याबाबत विकासक सर्वस्वी जबाबदार राहतील.

करीता उक्त अटी/शर्तीस अधीन राहून तसेच मा.सर्वसाधारण सभेच्या सुचना/निर्देश असल्यास त्यानुसार अर्जदार श्री.यमाजी रिठे, श्री.शांतीलाल रिठे, श्री.हिरामण रिठे आणि त्यांचे नोंदणीकृत आममुखत्यार व विकासक सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी. तर्फे श्री.नितीन वेणुप्रसाद बगडीया यांच्या गट क्रमांक ७०८, मौ.चिकलठाणा येथील मालकी हक्क जमीनीतून जाणाऱ्या महानगरपालिकेच्या २४ मी. व १२ मी. रूंद विकास रस्ता (एकूण लांबी ७१६.७४ मी. आणि क्षेत्रफळ १२२३०.०४ चौ.मी.) तसेच गट क्र.७०८ मधील विकास आराखड्यातील मैदान विकसीत करणे प्रस्तावित विकास योजना स्थितीबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे निकालास अधिन राहून अंदाजपत्रकांना मंजूरी देऊन या भागाचा विकास सामंजस्य करार तत्वावर (MOU) करण्यास महापालिका आयुक्त यांना सर्व अधिकार देणेस मान्यता होणेबाबतचा तसेच या प्रकरणी संबंधीत विकासक/जमीन मालक यांना द्यावयाच्या सर्व

परताव्याचे समायोजन करणे, बाधीत क्षेत्राचा विकास, नियंत्रण नियमावलीमधील तरतुदीनुसार TDR व इतर अनुषंगीक सर्व प्रकारचे परतावे या करीता संपूर्ण वैधानिक अधिकार आयुक्त, महानगरपालिका यांना देणे करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.यमाजी रिठे, श्री.शांतीलाल रिठे, श्री.हिरामण रिठे आणि त्यांचे नोंदणीकृत आममुखत्यार व विकासक सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.तर्फे श्री.नितीन वेणुप्रसाद बगडीया यांनी त्यांच्या दिनांक २५/३/२०१७ आणि दिनांक १२/९/२०१७ च्या विनंती अर्जाद्वारे गट क्र.७०८, मौ.चिकलठाणा येथील त्यांच्या जागेतून जाणाऱ्या महानगरपालिकेच्या २४ व १२ मीटर रूंद विकास योजना रस्त्याचा विकास स्वखर्चाने करणेबाबत सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून श्री.यमाजी रिठे, श्री.शांतीलाल रिठे, श्री.हिरामण रिठे आणि त्यांचे नोंदणीकृत आममुखत्यार व विकासक सिमर प्राईड व्हेंचर्स एल.एल.पी.तर्फे श्री.नितीन वेणुप्रसाद बगडीया यांच्या गट क्रमांक ७०८, मौ.चिकलठाणा येथील मालकी हक्क जमीनीतून जाणाऱ्या महानगरपालिकेच्या २४ मी. व १२ मी. रूंद विकास रस्ता (एकूण लांबी ७१६.७४ मी. आणि क्षेत्रफळ १२२३०.०४ चौ.मी.) विकसीत करणे तसेच गट क्र.७०८ मधील प्रस्तावित विकास आराखड्यातील मैदान मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहून विकसीत करणे इत्यादीच्या अंदाजपत्रकांना मंजूरी देऊन या भागाचा विकास महानगरपालिकेतर्फे सामंजस्य करार तत्वावर (MOU) करण्यास तसेच या प्रकरणी संबंधीत विकासक/जमीन मालक यांना द्यावयाचा सर्व परताव्याचे आर्थिक समायोजन करणे, FSI TDR व इतर अनुषंगीक परतावे या करीता उक्त प्रस्तावात नमुद केलेल्या अ.क्र.०१ ते २४ च्या अटी/शर्तीस अधीन राहून संपूर्ण वैधानिक अधिकार आयुक्त, महानगरपालिका यांना देण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३३२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरामध्ये जागतिक स्तरावरील बीबी-का-मकबरा, पानचक्की तसेच महानगरपालिकेचे शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालय, सिध्दार्थ उद्यान, हैदराबाद मुक्ती संग्राम संग्रहालय व इतर पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाची स्थळे आहेत. संपूर्ण वर्षभर देशी-विदेशी पर्यटक विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली या शहरास भेट देत असतात. याच माध्यमातून शहराचा समावेश जागतिक वारसा म्हणून घोषीत होणेसाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता शहरामध्ये एक अत्याधुनिक तारांगण (Planetarium cum Space Theatre) असावे ही बाब समोर आली आहे. याबाबत प्राथमिक माहिती प्राप्त करण्यात आली आहे.

तारांगणामुळे (Planetarium cum Space Theatre) मराठवाड्यातील तसेच या शहरास भेट देणाऱ्या पर्यटकांना खगोलशास्त्राविषयी अधिक अभ्यासपूर्ण माहिती प्राप्त होऊ शकेल. तसेच पर्यटन व शैक्षणिक क्षेत्रास अधिक चालना मिळेल. एकंदर औरंगाबाद शहराचे पर्यटन व शैक्षणिक दृष्ट्या हा प्रकल्प महत्वाचा होऊ शकेल. करीता औरंगाबाद शहरात सदर प्रकल्प उभारणे बाबत पुढील कार्यवाही हाती घेणे योग्य राहील.

या प्रकल्पा अंतर्गत १४ मीटर व्यासाचा काँक्रीटचा डोम तसेच त्यासाठी १२० सीट क्षमतेचे थिएटर, बुकींग रूम, स्वच्छतागृह इत्यादीचा डी.पी.आर.प्राप्त आहे. या प्रकल्पास अंदाजे ९.९५ कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी आवश्यक तांत्रिक स्पेसिफिकेशननुसार काम करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. या कामामध्ये थ्री डी तंत्रज्ञान वापरून ऑडिओ व व्हिडीओ द्वारे माहिती देण्यात येणार आहे. त्यात विविध ग्रहांची तसेच पृथ्वीची संपुर्ण माहिती देण्यात येणार आहे. या

प्रकल्पासाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाजे रूपये ९.९५ कोटी रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

या करीता प्रकल्पाचे स्थान निश्चित करणे, या क्षेत्रातील विविध कंपन्यांशी संपर्क करणे, आवश्यक माहिती प्राप्त करणे व अनुषंगीक बाबींकरीता प्रथम मान्यता देणे, प्रकल्पासाठी लागणाऱ्या खर्चाचे रूपये ९.९५ कोटी रक्कमेच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे इत्यादी कार्यवाही करीता तसेच आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना या प्रकल्पासाठी प्राधिकृत करणे करीता मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचे जागतिक स्तरावरील पर्यटनाचे असलेले स्थान आणि शैक्षणिक दृष्ट्या महत्वाचा होऊ शकेल असे अत्याधुनिक तारांगण (Planetarium cum Space Theatre) उभारणेसाठीच्या प्रकल्पा अंतर्गत १४ मीटर व्यासाचा कॉंक्रीटचा डोम तसेच त्यासाठी १२० सीट क्षमतेचे थिएटर, बुकींग रूम, स्वच्छतागृह इ. करीता तांत्रिक स्पेसिफिकेशननुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजे ९.९५ कोटी रूपये अपेक्षित खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. त्याचप्रमाणे या प्रकल्पाचे स्थान निश्चित करणे, या क्षेत्रातील विविध कंपन्यांशी संपर्क करणे, आवश्यक माहिती प्राप्त करणे व अनुषंगीक बाबींकरीता प्रथम मान्यता देणे इ. कार्यवाही करणे करीता आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्राधिकृत करणेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३३३:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांतीचौक येथील झाशीची राणी उद्यानाच्या महानगरपालिकेच्या जागेत स्वातंत्र्य संग्राम स्मारकाचे नुतनीकरण करणेचे काम स्मारक नुतनीकरण समितीमार्फत प्रगतीपथावर असुन पुर्णत्वाकडे आहे. प्रकरणी श्री.राम भोगले, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीयल ॲण्ड ॲग्रीकल्चर, औरंगाबाद यांनी दि.६/९/२०१७ रोजी पत्र देऊन सदरील स्मारकाच्या नावाचा, महानगरपालिकेच्या नावाचा यथोचित फलक लावणे तसेच या प्रकल्पाला विविध बॅंका, आस्थापना व उद्योगांचा सहयोग प्राप्त झालेला असल्याने त्यांचा यथोचित उल्लेख व नामनिर्देश होण्याची गरज असल्यामुळे स्मारकाच्या प्रतिमेस कोणताही धक्का न लावता या आस्थापनाच्या व बोधचिन्हांचा उल्लेख प्रवेशद्वाराजवळ व मागच्या भिंतीवर करणे. कै.जमनालाल बजाज यांची स्वातंत्र्य संग्रामात महात्मा गांधीचे पाचवे पुत्र म्हणुन ओळखले जात व त्यांच्या उद्योगांचा शहराच्या प्रतीत मोलाचा वाटा आहे. कै.बद्रीनारायण बारवाले हे मराठवाडा मुक्तीसंग्रामात सहभागी होते, त्यांच्या उद्योगाचा मराठवाड्याच्या प्रगतीत मोलाचा वाटा आहे, त्यांच्या कुटुंबाने परवानगी दिल्यास त्यांचा स्वातंत्र्य लढा व मुक्तीसंग्रामातील सहभागाचा यथोचित गौरव या प्रकल्पात असावा. तसेच शहरातील काही लोकप्रतिनिधी यांनी रक्कम रू.एक लक्ष प्रत्येकी वैयक्तिक अर्थसहाय्य या प्रकल्पास दिले आहे, त्यांचीही दखल प्रकल्पात घेण्याच्या परवानगी पत्राद्वारे केलेली असून कृपया सोबतच्या सदरील पत्राचे अवलोकन व्हावे.

करीता उपरोक्त प्रमाणे समितीच्या विनंतीनुसार स्मारकाच्या नावाचा तसेच महानगरपालिकेच्या नावाचा यथोचित फलक, स्मारकाच्या प्रतिमेस कोणताच धक्का न लावता विविध बॅंका, आस्थापना व उद्योगांचा नावाचा व बोधचिन्हाचा उल्लेख व नामनिर्देश, कै.जमनालाल बजाज यांचा स्वातंत्र्य संग्रामातील सहभाग आणि कै.बद्रीनारायण बारवाले यांचा स्वातंत्र्यलढा व मुक्तीसंग्रामातील सहभागाचा यथोचित गौरव, शहरातील काही लोकप्रतिनिधी यांनी रक्कम रू.एक लक्ष प्रत्येकी वैयक्तिक अर्थसहाय्य

या प्रकल्पास दिले आहे. त्यांची दखल भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, मुक्तीसंग्रामाचा इतिहास व १८५७ साली शहरात झालेल्या घटनांचा थोडक्यात इतिहास स्मारकात शिलालेखाच्या माध्यमातून बसविणे, क्रांतीचौक स्मारकाच्या इतिहासाचा एक फलक स्मारकाच्या मागच्या भिंतीवर लावणे इत्यादी वरील सर्व संकल्पना सदर ठिकाणी करणेची परवानगी सदरील स्वातंत्र्य संग्राम स्मारकाचे नुतनीकरण समितीस देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक येथील झाशीची राणी उद्यानाच्या महानगरपालिकेच्या जागेत स्वातंत्र्य संग्राम स्मारकाचे नुतनीकरण करणेचे काम स्मारक नुतनीकरण समितीमार्फत प्रगतीपथावर असुन पुर्णत्वाकडे असल्याने तसेच उपरोक्त प्रमाणे समितीच्या विनंतीनुसार स्मारकाच्या नावाचा तसेच महानगरपालिकेच्या नावाचा यथोचित फलक, स्मारकाच्या प्रतिमेस कोणताच धक्का न लावता विविध बँका, आस्थापना व उद्योगांचा नावाचा व बोधचिन्हाचा उल्लेख व नामनिर्देश, कै.जमनालाल बजाज यांचा स्वातंत्र्य संग्रामातील सहभाग आणि कै.बद्रीनारायण बारवाले यांचा स्वातंत्र्यलढा व मुक्तीसंग्रामातील सहभागाचा यथोचित गौरव, शहरातील काही लोकप्रतिनिधी यांनी रक्कम रू.एक लक्ष प्रत्येकी वैयक्तिक अर्थसहाय्य या प्रकल्पास दिले आहे. त्यांची दखल भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास, मुक्तीसंग्रामाचा इतिहास व १८५७ साली शहरात झालेल्या घटनांचा थोडक्यात इतिहास स्मारकात शिलालेखाच्या माध्यमातून बसविणे, क्रांतीचौक स्मारकाच्या इतिहासाचा एक फलक स्मारकाच्या मागच्या भिंतीवर लावणे इत्यादी वरील सर्व संकल्पना सदर ठिकाणी करणेची परवानगी सदरील स्वातंत्र्य संग्राम स्मारकाचे नुतनीकरण समितीस देणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३३४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा येथील संजयनगर, जिन्सी चौक ते तेलंगवाडा येथे ५० टक्के दलित वसाहत असुन त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचाविण्यासाठी विकास कामे करण्यासाठी शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत खालील कामे करण्यासाठी निधी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव शिफारस करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

कामाचे नांव :- वॉर्ड क्र.४६ अंतर्गत तेलंगवाडा ते रेंगटीपुरा रस्त्याचे ट्रिमिक्स काँक्रेटींग करणे-३० लक्ष

**सुचक:**-श्री.खान फेरोज मोईनुद्दीन **अनुमोदक:-** श्री.गंगाधर नामदेव ढगे

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.४६ नवाबपुरा येथील संजयनगर, जिन्सी चौक ते तेलंगवाडा येथे ५० टक्के दलित वसाहत असलेल्या भागात शासनाच्या दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत च्वॉर्ड क्र.४६ अंतर्गत तेलंगवाडा ते रेंगटीपुरा रस्त्याचे ट्रिमिक्स काँक्रेटींग करणे रु.३० लक्ष निधी प्राप्त होण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी मा.जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव शिफारस करणेसाठी मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३३५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.११० मयुरबन कॉलनी अंतर्गत शांतीनाथ हौ.सो.मधील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत या परिसरातील रहिवाशी नागरीकांसाठी सांस्कृतिक हॉल/सभागृह

बांधण्यात यावे. जेणे करून या परिसरातील युवक युवतींना त्यांच्या सांस्कृतिक कला जोपासण्यासाठी एक साधन उपलब्ध होईल अशी मागणी या परिसरातील नागरीकांनी केलेली आहे.

नागरीकांच्या मागणीचा विचार करता शांतीनाथ हौ.सो.मध्ये असलेल्या महानगरपालिकेच्या खुल्या जागेत महानगरपालिकेतर्फे एक सांस्कृतिक हॉल/सभागृह बांधण्यात यावे. करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे **अनुमोदक:-**श्रीमती मिना गायके, सौ.सुरेखा सानप

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.११० मयुरबन कॉलनी अंतर्गत शांतीनाथ हौ.सो.मधील महानगरपालिकेच्या खुल्या जागेत महानगरपालिकेतर्फे सांस्कृतिक हॉल/सभागृह बांधण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३३६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, माझे वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी मध्ये हिंदु, दलित व क्रिश्चन समाजासाठी स्मशानभुमी व मुस्लीम समाजाची कब्रस्तान एकाच ठिकाणी आहे. येथील मुस्लीम कब्रस्तानात शेजारील ८ ते १० वॉर्डातील अंदाजे २० ते २२ हजार लोकसंख्याची वसाहती आहे. येथील व शहराच्या अन्य भागातील लोकांची दफन विधी सुध्दा याच कब्रस्तानात होते. मुस्लीम समाजाची कब्रस्तानात मागील २५ ते ३० वर्षापासून दफनविधी सतत होत असल्याने येथील जागा अपुरी पडत आहे. त्यामुळे येथील रहिवासीयांना सुध्दा शहरातील इतर ठिकाणच्या कब्रस्तानात दफनविधीसाठी न्यावे लागते. त्यामुळे अनेकांची गैरसोय होत आहे.

मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानालगत मनपाची २० गुंठे जागा असून येथे येणे-जाण्यास एकच व फार अरूंद रस्ता असल्यामुळे व जागा कब्रस्तानाच्या मागे असल्याने येथे कोणतेही विकास काम करता येत नसल्याने सदरील जागा अंदाजे ४० ते ५० वर्षापासून पडीक अवस्थेत आहे. (ज्याचा शिट नं.३२५ व ३२५/अ व सिटीएस नं.१२०४१ जुना सर्वे नं.३५ आहे.)

करीता वॉर्ड क्र.६१ मधील मनपाची पडीक २० गुंठे जागा मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानास दफनविधीसाठी उपलब्ध करून देण्याकरिता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.जाहगीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी

**अनुमोदक:-**श्री.खान फेरोज मोईनुद्दीन, श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.६१ अल्तमश कॉलनी मध्ये मुस्लीम समाजाच्या कब्रस्ताना लगत अंदाजे ४० ते ५० वर्षापासून पडीक अवस्थेत असलेली (ज्याचा शिट नं.३२५ व ३२५/अ व सिटीएस नं.१२०४१ जुना सर्वे नं.३५ आहे.) मनपाची २० गुंठे जागा मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानास दफनविधीसाठी उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३३७ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१६-१८ वॉर्ड क्र.४९ अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष परिसरातील नागरीकांच्या सुविधेसाठी बदलण्यात यावे. म्हणुन प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र.पान क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| | | वॉर्ड क्र.४९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय | ५.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| SCR-WARD-01 पान क्र.४ अ.क्र.२६ | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. आर्थिक तरतुद रु.१०.०० लक्ष. | मुख्य गेट समोर हायमास्ट लावणे बाबत. | लक्ष |
| | | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत टाऊन हॉल, जुनाबाजार, अजीम कॉलनी, सुराणा अपार्टमेंट परिसर भागात विद्युत व्यवस्था करणे बाबत. | ५.०० लक्ष |

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे **अनुमोदक:-**श्री.सय्यद मतीन रशीद
मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०१६-१८ वॉर्ड क्र.४९ अंतर्गत खालील कामाचे लेखाशिर्ष परिसरातील नागरीकांच्या सुविधेसाठी बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र.पान क्र. | जुने कामाचे नाव | नवीन कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| SCR-WARD-01 पान क्र.४ अ.क्र.२६ | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत विविध ठिकाणी कॉंक्रीटीकरण करणे. आर्थिक तरतुद रु.१०.०० लक्ष. | वॉर्ड क्र.४९ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मुख्य गेट समोर हायमास्ट लावणे बाबत. | ५.०० लक्ष |
| | | वॉर्ड क्र.४९ अंतर्गत टाऊन हॉल, जुनाबाजार, अजीम कॉलनी, सुराणा अपार्टमेंट परिसर भागात विद्युत व्यवस्था करणे बाबत. | ५.०० लक्ष |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३३८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९३, पुंडलिक नगर अंतर्गत हनुमान नगर या ठिकाणी बहुसंख्य अनुसुचित जाती जमातीचे लोक राहतात. त्यांना लागणाऱ्या सुविधा जसे पाणीपुरवठा, ड्रेनेज लाईन, कॉंक्रीट रोड, पथदिवे यांची वारंवार मागणी करतात. सुविधांची त्या ठिकाणी अत्यंत बिकट अवस्था आहे.

करीता, दलित वस्ती सुधार योजनेतून वरील प्रकारची कामे करण्यासाठी अंदाजपत्रके तयार करून प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती मिनाताई रामदास गायके **अनुमोदक:-**श्रीमती मोरे ज्योती राजाराम
मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९३, पुंडलिक नगर अंतर्गत हनुमान नगर येथे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत पाणीपुरवठा, ड्रेनेज लाईन, कॉंक्रीट रोड, पथदिवे इ.कामे करण्यासाठी अंदाजपत्रके तयार करून प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे पाठविण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३३९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा अंतर्गत महानगरपालिकेचे आरोग्य केंद्रास श्री.संत शिरोमणी सावता महाराज असे नाव देण्याबाबतची या परिसरातील नागरीकांची मागणी आहे. "श्री.संत शिरोमणी सावता महाराज" हे १२ व्या शतकामध्ये हे आरोग्य विषयाक ज्ञात असणारे वनस्पतींची पारख असल्यामुळे तत्कालीन आयुर्वेदीक डॉक्टर होते. अशा महान संतांचे नाव चिकलठाणा

मनपा आरोग्य केंद्रास देण्यात यावे. दिनांक १५.०३.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभाचा ठराव क्र.३५५ रद्द करण्यात यावा. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्रीमती ज्योती सुनिल नाडे **अनुमोदक:-**श्रीमती आशा नरेश भालेराव

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक १५.०३.२०१६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभाचा ठराव क्र.३५५ रद्द करून वॉर्ड क्र.८९, चिकलठाणा अंतर्गत महानगरपालिकेचे आरोग्य केंद्रास "श्री.संत शिरोमणी सावता महाराज" असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३४० :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, राष्ट्रीय महाकवी वामन दादा कर्डक यांनी आयुष्याची ७० वर्षे आपल्या बुलंद, क्रांतीकारी लेखणीच्या व गाण्याच्या माध्यमातून फुले/शाहु/आंबेडकर/ साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आदि महापुरूषांचे मानवतावादी अनमौलिक विचार व त्यांचे कार्य जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य केले आहे. वामनदादा कर्डक हे स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांच्या कार्याची व थोर विचारांची तमाम आंबेडकरी जनतेला जाणीव व्हावी व प्रेरणा मिळावी या करीता लोककवीरत्न वामनदादा कर्डक यांचा पुतळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या उद्यानात बसविणेसाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.गंगाधर नामदेव ढगे

**अनुमोदक:-**श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड,श्रीमती ज्योती जयेश अभंग,श्री.राहुल पंढरीनाथ सोनवणे

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राष्ट्रीय महाकवी वामन दादा कर्डक यांच्या कार्याची व थोर विचारांची तमाम आंबेडकरी जनतेला जाणीव व्हावी व प्रेरणा मिळावी या करीता लोककवीरत्न वामनदादा कर्डक यांचा पुतळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या उद्यानात बसविणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक १३४१:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनांच्या ६१ व्या दिनानिमीत्त धम्मदिक्षा एकसष्ठी समारंभानिमीत्ताने दिनांक २८ व २९ ऑक्टोंबर २०१७ रोजी जागतीक दर्जाचे बुध्दिस्ट फेस्टिव्हलचे आयोजन "धम्मयाना एज्युकेशन व चॅरीटेबल ट्रस्ट व इंटरनॅशनल बुध्दिस्ट फेस्टिव्हल-२०१७" यांच्या संयुक्त विद्यमाने जबिंदा लॉन्स्, बीडबायपास, औरंगाबाद येथे करण्यात आलेले आहे.

सदरील फेस्टिव्हल आंतरराष्ट्रीय स्तरावरील असून त्यास भारत सरकारातील व महाराष्ट्र शासनातील मंत्री तसेच विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. तसेच श्रीलंकेचे माजी राष्ट्रपती मा.महींद राजपक्षे व तेथील लोकप्रतिनिधी, राजदूत उपस्थित राहणार आहेत.

करीता, सदरील फेस्टिव्हलचे आंतरराष्ट्रीय महत्व लक्षात घेऊन महानगरपालिकेतर्फे या फेस्टिव्हलसाठी र.रु.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) ची मदत करण्यात यावी.

करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-**श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक:-**श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, "धम्मयाना एज्युकेशन व चॅरीटेबल ट्रस्ट व इंटरनॅशनल बुध्दिस्ट फेस्टिव्हल-२०१७" यांच्या संयुक्त विद्यमाने जबिंदा लॉन्स्, बीडबायपास, औरंगाबाद येथे धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनांच्या ६१ व्या वर्धापना दिनानिमीत्त धम्मदिक्षा एकसष्ठी समारंभानिमीत्ताने दिनांक २८ व २९ ऑक्टोंबर २०१७ रोजी आयोजीत जागतीक दर्जाचे बुध्दिस्ट फेस्टिव्हलचे आंतरराष्ट्रीय महत्व लक्षात घेऊन या फेस्टिव्हलसाठी महानगरपालिकेतर्फे र.रु.१,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख फक्त) ची मदत देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३४२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पंडीत दिन दयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष जो की नगर परिषद संचालनालय (DMA) महाराष्ट्र यांचे अंतर्गत कार्यरत आहे, त्यांचा नागरी बेघरांना निवारा नुतनिकरण करणे संबधी प्रशासकीय मान्यता आदेश प्राप्त झाला असून या आदेशा नुसार औरंगाबाद शहरातील पाच ठिकाणी कार्यरत असलेले, चिकलठाणा येथील मुख्य रस्त्यावरील बंद असलेल्या इमारतीची दुरुस्ती करुन सदर इमारती मध्ये एका मजल्याची वाढ करणे यासाठी (Repair & Refurbisment) करणे साठी खालील तक्त्यात नमूद प्रमाणे निधी मंजूर केला आहे.

**(रुपये लाखात)**

| अ.क्र | शहरी बेघर निवाऱ्याचे नाव व स्थळ | मंजुर निधी | | एकुण मंजुर निधी | निवाऱ्याची माणसी क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| | | देखभाल दुरुस्तीसाठी | व्यवस्थापना साठी | | |
| १ | मोती कारंजा (जुनी मनपा शाळा इमारत) | ३७.५१ | ६.०० | ४३.५१ | ८३ |
| २ | गांधी नगर (जुनी मनपा मॉडेल मिडेल स्कुल इमारत) | २८.३६ | ६.०० | ३४.३६ | १०० |
| ३ | संत गाडगे बाबा मनपा सभागृह इमारत(रेल्वे स्टेशन) | २२.८० | ६.०० | २८.८० | ४९ |
| ४ | एन -६ सिडको मनपा सभागृह इमारत | ३१.४५ | ६.०० | ३७.४५ | ३७ |
| ५ | चिकलठाणा मुख्य रस्त्यावरील बंद असलेली मनपा सभागृह इमारत | ६९.८६ | ६.०० | ७५.८६ | ५५ |
| ६ | जुने मनपा वार्ड कार्यालय चिकलठाणा इमारत | -- | २.०० | २.०० | १५ |
| ७ | हर्सुल वसाहत मनपा सभागृह इमारत | -- | २.०० | २.०० | १५ |
| ८ | कोहीनुर कॉलनी रेखांकनातील मनपा सभागृह इमारत(पानचक्की जवळ) | -- | २.०० | २.०० | १८ |
| एकुण मंजुर निधी | | १८९.९८ | ३६.०० | २२५.९८ | ३७२ |

वर नमुद प्रमाणे विस्तृत अंदाजपत्रके, नकाशासह शासनास सादर करण्यात आली होती, एकुण मंजुर निधीपैकी रुपये १८९.९८ लक्ष निधी देखभाल/दुरुस्तीसाठी क्षत्रवाढ करण्यासाठी मंजुर करण्यात आला असून या व्यतिरिक्त रुपये ३६.००लक्ष निधी व्यवस्थापन खर्चासाठी शासनाने मंजुर केले आहेत व अशा रितीने एकुण रुपये २२५.९८ लक्षचा निधी राष्ट्रीय शहरी उपजिविका अभियान (NULM) अंतर्गत वापरण्यास अनुज्ञेय करण्यात आले आहे. मा.सुप्रीम कोर्टाने शहरातील गरीब बेघर नागरीकांची गैरसोय विचारात घेऊन स्वत: प्रकरणात दखल देऊन, अशा बेघर नागरीकांसाठी विविध नागरी क्षेत्रात सर्व सोयीयुक्त निवारे उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले होते त्यानुसार केंद्र शासनाने प्रकरणात अधिकारीता दर्शवित राज्यांना निर्देश जारी केले होते.

या सुचनांची व निर्देशाची अंमलबजावणी महानगरपालिका औरंगाबाद वर्ष २०११-२०१२ पासुन करीत आहे व आजमितीस सात शहरी बेघर निवारे कार्यरत आहेत. त्यापैकी मनपाच्या जुन्या वार्ड कार्यालयाच्या इमारतीमध्ये सदयस्थितीत कार्यरत असलेले शहरी बेघर निवारा केंद्रामध्ये पुरेशी हवा व प्रकाश व्यवस्था नसल्याने तसेच या ठिकाणी निवाऱ्याची क्षमता वाढविणे शक्य नसल्याने व याच कारणाने या भागात औरंगाबाद-जालना मुख्य रस्त्यावर मनपाचे जुने बंद पडलेले मनपा सभागृह या बेघर निवाऱ्यासाठी वापरणे बाबत सदर बेघर निवारा केंद्र बंद करणे बाबत मा.संचालक नगर परिषद संचलनालय यांनी निर्देशित केले आहे. तसेच कोहीनुर कॉलनी भागात पूर्वी रेखांकनातील सभागृह शहरी बेघर केंद्रासाठी सन २०११ पासून ताब्यात घेण्यात आले होते मात्र या भागातील नागरीकांनी सदर सभागृह त्यांच्या रेखाकंनातील उपयोगासाठी रिक्त करणे बाबत वारंवार आग्रह केल्याने सदर कोहीनूर कॉलनी मनपा सभागृह इमारत रिक्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. आता शहरात वरील रकान्यात प्रमाणे दुरुस्ती नंतर पाच शहरी बेघर निवारे उपलब्ध होणार असून त्यामुळे शहरी बेघर निवाऱ्याची एकुण माणशी क्षमता एकुण ३७२ एवढी राहणार आहे. या बेघर निवाऱ्यामध्ये स्त्रीयांसाठी व पुरुषासाठी स्वतंत्र व्यवस्था प्रस्तावीत करण्यात आलेली आहे. शहरात बहुतांश शहरी बेघर निवारे दुरुस्ती करणे आवश्यक असुन, सोबतच इतर पुरक सुविधा देणे आवश्यक आहे.ज्यामध्ये शयनासाठी गादी/उशी पुरविणे किचनसाठी गॅस शेगडी व भांडी उपलब्ध करुन देणे, आंघोळीसाठी गरम पाणी उपलब्ध होणेस्तव सोलार वाटर सिस्टम बसविणे, अग्निशमक यंत्र बसविणे इत्यादी बाबींचा समावेश आहे.

उक्त सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन कार्यालयाने अंदाजपत्रके तयार केली असुन शासनस्तरावरुन मंजुरी देण्यासाठी शहारातील प्रस्तावित सर्व बेघर निवाऱ्याची स्वतः संचालक नगर परिषद संचालनालय, (DMA) यांनी एप्रिल/मे २०१७ मध्ये भेट देऊन पाहणी केली आहे. व पाहणीनंतर शासनस्तरावरुन मंजुरी प्रदान केली व तसा आदेश क्रमांक रानाउअ/२०१७/निवारा/ प्र.क्र./का-१६/१५२९/नगर परिषद संचालनालय, महाराष्ट्र शासन यांनी जारी केला आहे.

या कामासाठी इतर शासकीय विभागाच्या इमारती उपलब्ध नसल्याने तसेच या इमारतीचा इतर विधायक कामासाठी वापरात नसल्याने महानगरपालिकेने आपल्या काही कारणाने वापरात नसलेल्या इमारती दुरुस्त करुन, वापरायोग्य करुन वापरात घेतल्या आहेत/घेण्यात येत आहेत. यापुर्वीही शासनाने वर्ष २०११-२०१२ मध्ये शहरी निवारे दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन दिला होता. व त्यानुसार आवश्यक दुरुस्ती करण्यात आली होती. आता शासनाने शहरी बेधराची बाब अधिक गांभीर्याने घेऊन पुर्वीच्या रात्र निवाऱ्याचे रुपांतर पुर्णतः शहरी बेघरासाठीचे निवासस्थानात केले असुन सदर बेघर निवारे २४ तासासाठी कार्यरत ठेवायचे आहेत. या शहरी बेघर निवाऱ्यामध्ये राहण्याची, जेवणाची/स्वंयपाकगृह/डायनिंग हॉल/स्वच्छतागृहे व इतर अनुषंगिक सुविधा उपलब्ध करुन द्यावयाचे सुचित केले आहे. यासर्व बेघर निवाऱ्याचे व्यवस्थापन महानगरपालिका कायालयीन शहर प्रकल्प अधिकारी तथा उप आयुक्त (महसुल) यांच्या मार्फत केले जात असुन व देखभाल/दुरुस्ती ही नोडल अधिकारी (जलनिःसारण प्रकल्प) यांचेकडे सोपविण्यात आली आहे.

त्यासाठी वरील परिच्छेदात नमूद प्रमाणे अनुक्रमांक १ ते ४ मध्ये नमूद शहरी बेघर निवारा हे मनपाच्या मालकीच्या इमारती मध्ये कार्यरत असून, अनुक्रमांक ५ मधील मनपा सभागृहाची (इमारत) जी की, विनावापर पडून असून ती दुरुस्त करुन व त्यामध्ये एका मजल्याची वाढ करुन, सदर इमारत शहरी बेघर निवाऱ्यासाठी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. अशा प्रकारची सुविधा शहरी बेघरांसाठी करणे आवश्यक असून तसे शासनाचे निर्देश आहेत. सदरची शहरी बेघर निवारे महानगरपालिकेने, राज्य शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या शहरी बेघर निवाऱ्या साठीच्या निधी मधून त्याची दुरुस्ती करणे व त्याचे व्यवस्थापन करणेसाठी अनज्ञेय करण्यात आले आहे. यासाठी आवश्यक निधी महानगरपालिकेकडे शासनाने यापूर्वीच उपलब्ध करुन दिला आहे.

जो मंजुरी आदेश राज्य शासनाकडून प्राप्त झाला आहे, त्यातील अटी व शर्ती नूसार या कामांसाठी (१) निविदा प्रक्रीया एक महिन्याच्या आत पार पाडणे (२) या कामासाठी झालेल्या खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र (Utilization Certificate) सादर करणे (३) नूतनीकरण कार्यादेशापूर्वी या कामासाठी देखभाल व व्यवस्थापन

समिती गठीत करणे, (४) शहरी बेघर निवाऱ्याचे नूतनीकरण पूर्ण झाल्या नंतर त्याचे संचलन स्वत: मनपाने करणे किंवा खाजगी सामाजीक संस्थेच्या मार्फत (NGO) देखभाल व्यवस्थापन करणे व यासाठी शासनाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अमल करणे (५) सदरचे शहरी बेघर निवाऱ्याचे व्यवस्थापन पाच वर्षानंतर मनपाने स्वखर्चाने करणे (६) जागेची मालकी स्वत:ची असणे (७) या प्रस्तावा अंतर्गत समाविष्ठ कामांचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून या कामांचे थर्ड पाटी टेक्निकल इन्स्पेक्शन मनपाचे स्वखर्चाने करणे (८) सदरचे निवारे २४X७ प्रमाणे कार्यरत ठेवणे (९) निवारे सुरु करण्यापूर्वी तेथे CCTV ची व्यवस्था मनपाने स्वखर्चाने करणे इत्यादी कामे करणे बंधनकारक आहे.

त्यास्तव मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, प्राप्त शासन मंजुरी तसेच मनपाची पर्यायाने शासन व्यवस्थेची शहरी बेघरांसाठीच्या निवाऱ्याची व्यवस्था करणे, आदयकर्तव्य असल्याने मनपाकडे शहरी बेघर निवाऱ्या अंतर्गत निधीची उपलब्धता तपासून वरील परिच्छेदात नमूद प्रमाणे पाच शहरी बेघर निवाऱ्याची दुरुस्ती करणे आवश्यक विद्युतीकरण करणे, यासाठी एकुण रु. १८९.९८ लक्ष च्या स्थापत्य व विद्युत विषयक कामास तसेच व्यवस्थापन खर्चा पोटी रु.३६.०० लक्ष यास मनपा स्तरावरुन प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

तरी वर नमूद प्रमाणे (१) रुपये १८९.९८ लक्ष च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्याचा (२) या कामासाठी तांत्रिक लेखापरिक्षण (Third Party Technical Audit) शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांच्याकडून शासन निर्णया नूसार करुन घेण्यासाठी त्यांची नेमणूक करणे, (३) या शहरी बेघरांसाठी वापरात असलेल्या व वापरात घेण्यात येत असलेल्या इमारती इतर वापरात नसल्याने पुढील पाच वर्षा करीता याच उदेशासाठी राखीव ठेवणे (४) या शहरी बेघर निवाऱ्याच्या अनुषंगाने शासन निर्देशानूसार आवश्यक कार्यवाही करणे व भविष्यात लागणाऱ्या इतर अनुषंगीक कामास मंजुरी देणे बाबत कार्यवाही करण्याचे इत्यादी अधिकार प्रशासकीय प्रमुख या नात्याने आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्या बाबतचा प्रस्ताव अवलोकनास्तव व मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :चिकलठाणा येथील मुख्य रस्त्यावरील मनपा सभागृह इमारत सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.१०८२ दि.२०/५/२०१७ नुसार देविदासभाऊ नवपूते हे सभागृह क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला मंडळास भाडेतत्वावर देण्यास मान्यता दिलेली असल्याने अ.क्र.५ वरील नियोजित रात्र निवारा केंद्राचे नांव प्रस्तावातून वगळण्यात येत आहे. दुरुस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पंडीत दिन दयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष नगर परिषद संचालनालय (DMA) महाराष्ट्र यांचे अंतर्गत नागरी बेघरांना निवारा नुतनिकरण करणे संबधी औरंगाबाद शहरातील पाच ठिकाणी कार्यरत असलेले रात्र निवारा केंद्रांच्या इमारतींची (Repair & Refurbisment) करणे साठी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अंदाजपत्रकीय खर्चास मान्यता देण्यात येते. प्रस्तावातील अ.क्र.५ वर नमुद केलेले जालना रोडवरील देविदासभाऊ नवपूते हे सभागृह क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला मंडळास भाडेतत्वावर देण्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक १०८२ दि.२०/५/२०१७ अन्वये मान्यता दिलेली असल्याने अ.क्र.५ वरील नियोजित रात्र निवारा केंद्राचे नांव प्रस्तावातून वगळण्यात येत आहे.

**(रुपये लाखात)**

| अ.क्र | शहरी बेघर निवाऱ्याचे नाव व स्थळ | मंजुर निधी | | एकुण मंजुर निधी | निवाऱ्याची माणसी क्षमता |
|---|---|---|---|---|---|
| | | देखभाल दुरुस्तीसाठी | व्यवस्थापना साठी | | |
| १ | मोती कारंजा (जुनी मनपा शाळा इमारत) | ३७.५१ | ६.०० | ४३.५१ | ८३ |
| २ | गांधी नगर (जुनी मनपा मॉडेल मिडेल स्कुल इमारत) | २८.३६ | ६.०० | ३४.३६ | १०० |
| ३ | संत गाडगे बाबा मनपा सभागृह इमारत(रेल्वे स्टेशन) | २२.८० | ६.०० | २८.८० | ४९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | एन -६ सिडको मनपा सभागृह इमारत | ३१.४५ | ६.०० | ३७.४५ | ३७ |
| ५ | जुने मनपा वार्ड कार्यालय चिकलठाणा इमारत | -- | २.०० | २.०० | १५ |
| ६ | हर्सुल वसाहत मनपा सभागृह इमारत | -- | २.०० | २.०० | १५ |
| ७ | कोहीनुर कॉलनी रेखांकनातील मनपा सभागृह इमारत(पानचक्की जवळ) | -- | २.०० | २.०० | १८ |

राज्य शासनाकडून प्राप्त आदेशातील अटी-शर्ती व मार्गदर्शक तत्वानुसार तरी वर नमूद प्रमाणे

(१) सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते.
(२) या कामासाठी तांत्रिक लेखापरिक्षण (Third Party Technical Audit) करीता शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद यांची नेमणूक करणे,
(३) या शहरी बेघरांसाठी वापरात असलेल्या व वापरात घेण्यात येत असलेल्या इमारती इतर वापरात नसल्याने पुढील पाच वर्षा करीता याच उदेशासाठी राखीव ठेवणे
(४) शहरी बेघर निवाऱ्याच्या अनुषंगाने शासन निर्देशानूसार आवश्यक कार्यवाही करणे व भविष्यात लागणाऱ्या इतर अनुषंगीक कामास मंजुरी देणे बाबत कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३४३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की स.सदस्यांनी आपआपल्या वॉर्डातील रस्ते, चौक, उद्याने, मनपाच्या शालेय इमारती, सभागृह, आरोग्यकेंद्रे इत्यादींना नाव देण्याबाबतचे खालीलप्रमाणे प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७७ जवाहर कॉलनी | **प्रस्ताव:-**डॉ.हेडगेवार ते बँक ऑफ इंडिया या रस्त्यास माजी पंतप्रधान **लालबहादूर शास्त्री मार्ग** असे नाव देण्यात यावे.<br>**सुचक:-**श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी<br>**अनुमोदक:-**श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| २. | वॉर्ड क्र.९६ गारखेडा मेहेरनगर | **प्रस्ताव:-**सेव्हनहिल उड्डाणपुल ते गजानन महाराज महाराज मंदीर मार्गे सुतगिरणी चौक दरम्यानच्या मार्गास (रस्त्यास) **प.पु.पांडूरंग वैजनाथ शास्त्री आठवले मार्ग** असे नाव देण्यात यावे.<br>**सुचक:-**श्रीमती विमल गोविंद केंद्रे **अनुमोदक:-**श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी |
| ३. | वॉर्ड क्र.९९ जय विश्वभारती कॉलनी | **प्रस्ताव:-**विवेकानंद चौक ते अग्निहोत्री चौक पर्यंतच्या रस्त्याला **पंडीत दिनदयाल उपाध्याय मार्ग** असे नाव देण्यात यावे.<br>**सुचक:-** श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ<br>**अनुमोदक:-**श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी |

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स.सदस्यांनी त्यांच्या वॉर्डातील रस्ते, चौक, उद्याने, मनपाच्या शालेय इमारती, सभागृह, आरोग्यकेंद्रे इत्यादींना नांव देण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावानुसार खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| १. | वॉर्ड क्र.७७ जवाहर कॉलनी | **प्रस्ताव:-**डॉ.हेडगेवार ते बँक ऑफ इंडिया या रस्त्यास माजी पंतप्रधान **लालबहादूर शास्त्री मार्ग** असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. |
| २. | वॉर्ड क्र.९६ | **प्रस्ताव:-**सेव्हनहिल उड्डाणपुल ते गजानन महाराज महाराज मंदीर मार्गे सुतगिरणी |

| | | |
|---|---|---|
| | गारखेडा मेहेरनगर | चौक दरम्यानच्या मार्गास (रस्त्यास) **प.पु.पांडूरंग वैजनाथ शास्त्री आठवले मार्ग** असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. |
| ३. | वॉर्ड क्र.९९ जय विश्वभारती कॉलनी | **प्रस्ताव:-**विवेकानंद चौक ते अग्निहोत्री चौक पर्यंतच्या रस्त्याला **पंडीत दिनदयाल उपाध्याय मार्ग** असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक १३४४ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाची दिनांक २४.०२.२०१५ रोजीचे अधिसुचना व दिनांक १९.०५.२०१५ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार स्थानिक स्वराज्य संस्थेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या कामगारांचे किमान वेतन निश्चित केले असून त्याची प्रत माहितीस्तव त्या सोबत जोडून देण्यात आली आहे. सदर शासन अधिसुचनेनूसार औरंगाबाद महानगरपालिकके अंतर्गत कार्यरत कंत्राटी कुशल, अर्धकुशल, अकुशल श्रेणीनुसार किमान वेतन देण्यात यावे. अशी विनंती कामगार शक्ती संघटनेने केली आहे.

सदर अधिसुचनेनुसार कर्मचाऱ्यांशी वर्गवारी केली असून त्यानुसार (१) कुशल (२) अर्धकुशल (३) अकुशल कामगारांसाठी परिमंडळ-१, परिमंडळ-२ व परिमंडळ-३ नुसार वेतन दर निश्चित केले आहे.

या अधिसुचनेनुसार परिमंडळ-१ मध्ये अ,ब,क व ड वर्ग महानगरपालिकांचे क्षेत्र येते. असे नमुद केले आहे. त्यानुार सफाई कामगारांना अकुशल कामगार, परिमंडळ-१ नुसार किमान वेतन ११,५००/- महागाई भत्ता (रु) द.म.दर जानेवारी-२०१७ ते जुन-२०१७ सहा महिन्यांचा रु.३,६२८,२५/- प्रमाणे देणे बाबत नमुद आहे. तसेच मा.कामगार उपायुक्त, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.काउआ/औबाद/किवेअ/ ५९३२ दिनांक २५.०५.२०१७ रोजीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक २४.०२.२०१५ रोजीच्या अधिसुचनेद्वारे स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) या अनुसुचित उद्योगात रोजगार असलेल्या कामगारांचे किमान वेतन दर निर्धारित केलेले आहेत. सक्षम प्राधिकारी जानेवारी ते जुन व जुलै ते डिसेंबर या कालावधीसाठी विशेष भत्त्यांचे दर निर्धारीत करतात. अधिसुचनेद्वारे निर्धारीत करण्यात आलेले मुळ वेतन दर व संबंधीत कालावधीत निर्धारीत करण्यात आलेला विशेष भत्ता कामगारांना देण्यात यावा. अशी कायद्यात तरतुद आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr. No | Particular | Amount (In Rupees) |
|---|---|---|
| 1. | Basic (Minimum Wages Act) | 11,500.00 |
| 2. | D.A.(Notification 01.01.2017 to 30.06.2017) | 3638.25 |
| 3. | Monthly Wages (1+2) | 15.138.00 |
| 4. | HRA (5%on NO.3) As per workmen minimum HRA Act 1983 | 757.00 |
| 5. | Gross Salary (3+4) | 15.895.25 |
| 6. | EPF (13.36% on No.3) as per EPF Act-1952 | 2123.00 |
| 7. | ESIC (4.75% on No.5) as per ESIC Act-1948 | 755.00 |
| 8. | Bonus 8.33 % as per the new Notification Dt.01.01.2016 | 1324.00 |
| | **Total (5+6+7+8)** | 20,097.00 |

सदर प्रस्ताव मंजुर झाल्यास प्रतिमहा मनपाच्या तिजोरीवर रु.३० लक्ष इतका वाढीव बोजा पडेल म्हणजेच वार्षिक रु.८,४८,८९,७२८/- इतके एकुण खर्च अपेक्षीत आहे.

तसेच मा.स्थायी समिती सभागृहाचा ठराव क्र.७४ दिनांक १०.०८.२०१७ नुसार खाजगी अकुशल कर्मचारी यांचेसाठी जय बजरंग एजन्सी यांचे एकत्रीत दर रु.१३९५०/- प्रमाणे मंजुर करून

आवश्यकतेनुसार ११ महिन्यांसाठी मजुर लावण्यासाठी मा.आयुक्त यांच्या मान्यतेने कार्यालयीन आदेश निर्गमित केले आहे. करीता, प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर. प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २४.०२.२०१५ रोजीच्या अधिसुचनेप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थे अंतर्गत कार्यरत असणाऱ्या कामगारांचे (१) कुशल, (२) अर्धकुशल, (३) अकुशल अशा वर्गवारी नुसार किमान वेतन निश्चित केलेले आहेत. त्याचप्रमाणे कामगार उपायुक्त, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.काउआ/औबाद/किवेअ/५९३२ दिनांक २५.०५.२०१७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे शासनाने दिनांक २४.०२.२०१५ रोजीच्या अधिसुचनेद्वारे स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत वगळून) या अनुसूचित उद्योगात रोजगार असलेल्या किमान वेतनदर, निर्धारीत करण्यात आलेले मुळ वेतन दर व संबंधीत कालावधीत निर्धारीत करण्यात आलेला विशेष भत्ता कायद्यातील तरतुदीनुसार नियमाप्रमाणे कामगारांना देण्याबाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास अपेक्षीत खर्चासह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषीत केले.

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - [४८]

## सोमवार दिनांक १६.१०.२०१७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील प्रश्नोत्तरे.

**स.पालिका सदस्य श्री.सुभाष सयाजीराव शेजवळ (प्रभाग क्रमांक-१४)**
**प्रश्न क्रमांक ८७७ ते ८८१:-**
**उत्तर:- कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा),महानगरपालिका औरंगाबाद.**

| प्रश्न क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ८७७ | मे. शेख कन्स्ट्रक्शन या कंत्राटदारास महानगरपालिकेने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे देण्यात आलेले कंत्राट सन-२०१४ पासुन ते आजतागायत सुरु आहे काय? | देण्यात आले नाही. |
| ८७८ | सदरील कामाची निविदा मागविली असता निविदे मध्ये कार्यकारी अभियंता यांचे स्वाक्षरीचे अनुभव प्रमाणपत्र असणे आवश्यक असतांना संबंधीत कंत्राटदाराने ग्रामपंचायतीचे कचरा व पाणीपुरवठा बाबतचे अनुभव प्रमाणपत्र जोडले आहे, त्या आधारावर निविदेस मंजुरी कशी देण्यात आली? | अनुभव प्रमाणपत्राची पडताळनी करुन माहिती देण्यात येईल. |
| ८७९ | कंत्राटदाराने सादर केलेल्या नोंदणी प्रमाणपत्राची मुदत दिनांक २६.११.२०१३ ते दिनांक २५.११.२०१६ पर्यंत आहे, त्यांच्या प्रमाणपत्राची वैधता तपासावी. | आपल्या म्हणण्या प्रमाणे तपासण्यात येईल. |
| ८८० | विभागाने कंत्राटदाराची निविदा कोणत्या आधारे मंजुर केली? याबाबतची सविस्तर माहिती द्यावी. | पाणी पुरवठा करणे गरजेचे होते. शेवटी सातव्यांदा काढण्यात आलेली निविदा मा. स्थायी समितीने मंजुर केली. |
| ८८१ | पडेगाव येथील पाण्याच्या टाकीच्या परिसरात अतिक्रमण झाल्याबाबत विभागास तक्रार करुन देखील अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यास का विलंब होत आहे? याची माहिती देण्यात यावी. | अतिक्रमण विभागाला पत्र देण्यात आले आहे. |

(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.